## संपादकीय


## वैद्यकीय शिक्षणचा बाजार

देशातील सर्वात प्रतिष्ठित अभ्यासक्रमापैकी एक असलेल्या वैद्यकीय शिक्षणाला आता खूपच गंभीर स्वरूप आलेले आहे. नीट या पात्रता परीक्षेचा जो गोंधळ सध्या सुरू आहे त्यामुळे सर्वसामान्य पालक, विद्यार्थी वर्ग हतबल झाला आहे. सर्वोच्च न्यायालय काय निकाल देणार आणि त्याचा आपल्या भवितव्यावर काय परिणाम होणार याचीच चिंता २४ लाख कुटुंबांना लागली आहे. पेपरफुटी आणि गुणवाढ अशा दोन प्रकरणात तळापर्यंत जाऊन तपास झाल्यास सर्वोच्च न्यायालयाला निकाल देणे सोईचे होईल.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–८० | बुधवार दि.१० जुलै २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये


## कामासाठी फेऱ्या मारून कंटाळलेल्या व्यक्तीचा मंत्रालयात आत्महत्येचा प्रयत्न

मुंबई : मंगळवारी मंत्रालयात एक धक्कादायक घटना घडली. मंत्रालयात अनेक वेळा आपल्या कामासाठी फेऱ्या मारून देखील काम होत नसल्याने नाराज होऊन एका व्यक्तीने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. तो व्यक्ती आपल्या कामासाठी वारंवार मंत्रालयात येत होता. मात्र, त्याचे काम होत नसल्याने तो मंत्रालयाच्या पाचव्या मजल्यावरील खिडकीतील सज्जावर जाऊन बसला. तिथून उडी मारून आत्महत्या करण्याच्या प्रयत्नात तो व्यक्ती होता. मात्र तेथील कर्मचाऱ्यांनी त्यास वाचवले आहे. या मजल्यावरील एका खिडकीवर बसून हा व्यक्ती उडी मारण्याच्या प्रयत्नात होता. हा प्रकार जेव्हा मंत्रालयातील कर्मचाऱ्यांना समजला तेव्हा, त्यांनी त्याचे मन वळण्याचा प्रयत्न करत त्याला आत्महत्या करण्यापासून रोखले.

# शासनाकडून विमा कंपन्यांचे लाड




### हजारो शेतकऱ्यांच्या खात्यावर तुटपूंजी रक्कम, कारवाई मात्र काहीच नाही

**पुणे । प्रतिनिधी**

**भिक नको, पण कुत्रं आवर अशी सांगण्याची वेळ राज्यातील शेतकऱ्यांवर आली आहे. पीकविमा कंपन्यांनी राज्यातील हजारो शेतकऱ्यांच्या खात्यावर अगदी तुटपूंजी रक्कम जमा केली आहे. अस्मानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांची पीकविमा कंपनीकडून मदत तर दूरच मात्र उलट थट्टाच केली जात असल्याचे चित्र आहे. यावर कहर म्हणजे याबाबत चर्चा होऊनही शासनाने अद्याप कोणतीच कारवाई केलेली नाही. शासनाकडून विमा कंपन्यांचे होत असलेले लाड बघून शेतकऱ्यांमध्ये संताप पसरत असल्याचे दिसत आहे. विदर्भातील शेतकऱ्यांप्रमाणेच हिंगोलीतील शेतकरीही आंदोलनासाठी रस्त्यावर उतरले आहेत.**

अकोला जिल्ह्यातल्या अनेक गावांत शेतकऱ्यांना अवघे १००, २००, ५०० रूपयांची नुकसान भरपाई देण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मनात या पीकविमा कंपन्यांविरोधात प्रचंड संतापाची लाट उसळली आहे. या विमा प्रकरणावरून राजकिय वातावरण चांगलेच तापले होते. विरोधकांनी याबाबत सरकारला जाब विचारला मात्र यावर सरकारने सफाईदार उत्तर देण्याबरोबरच दोष आढळल्यास कारवाई करण्याचेही सांगितले होते मात्र अद्याप असली कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही. शासनाच्या या भुमिकेबाबत आता शेतकऱ्यांमधून संताप व्यक्त होत आहे. शेतकरी आंदोलनाचा मार्ग पत्करू लागले आहेत. अकोल्या मध्येतर विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांवर अन्याय झाल्याची अप्रत्यक्ष कबुली कृषी विभागाने दिली आहे. नवऱ्यानं मारलं अन पावसानं झोडपलं तर सांगायचं कुणाला? अशी म्हण ग्रामीण भागात आहे. अगदी तसेच अस्मानाने मारले, सुल्तानाने झोडले, अन् पीकविमा कंपन्यांनी ओरबाडले तर सांगायचे कुणाला? सरकार या पीकविमा कंपन्यांच्या कारभाराला चाप लावणार का?, हाच खरा प्रश्न आता शेतकऱ्यांना पडला आहे. त्यामुळे आता या प्रकरणी प्रशासन नेमकी काय करणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## मिहीर शाहाला अटक

मुंबई: वरळी हिट अँड रन अपघात प्रकरणातील मुख्य आरोपी मिहीर शाहाला शहापूरमधून अटक करण्यात आले आहे. या प्रकरणात मिहीर शाहाची आई आणि बहिणीलाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तसेच या आरोपीला मदत करणाऱ्या १२ जणांनाही मुंबईच्या गुन्हे शाखेने ताब्यात घेतले आहे.

मिहीर शाहाने दारूच्या नशेत भरधाव वेगाने गाडी चालवून वरळीमधील ॲट्रिया मॉलजवळ कावेरी नाखवा या महिलेचा जीव घेतला होता. त्यानंतर तो फरार झाला. आता पोलिसांनी दोन दिवसांनंतर त्याला शहापूरमधून अटक केली आहे. मिहीर शाहाची वैद्यकीय चाचणी केली जाणार आहे. अपघात झाल्यानंतर फरार झालेल्या मिहीर शाहाच्या मागावर मुंबई पोलिसांच्या ◀◀ पान २ वर

# मनोज जरांगेंकडून धनंजय मुंडे पुन्हा जातीय टार्गेट

### » पालकमंत्र्यांना असला जातीवाद शोभत नाही; बीडमध्ये रॅली काढणारच–जरांगे

**लातूर । प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीपासून सुरु झालेले जातीय रणकंदन थांबण्याचे नाव घेत नाही. मनोज जरांगे यांच्याकडून कृषीमंत्री धनंजय मुंडे हे पुन्हा जातीय टार्गेट झाले आहेत. फडणवीस साहेब आणि अजित पवार यांच्या सांगण्यावरुन बीडच्या पालकमंत्र्यांनी तिथल्या एसपीला सांगून तिथली रॅलीची परवानगी रद्द केली. तरीही सांगतो, बीडची रॅली शांततेत होणार, असे म्हणत बीडमध्ये ११ जुलै रोजी शांतता रॅली होणारच असे जरांगे यांनी ठणकावून सांगितले. यावेळी, अप्रत्यक्षपणे त्यांनी धनंजय मुडेंवर निशाणाही साधला. पालकमंत्र्यांना असला जातीवाद शोभत नाही, असे ते म्हणाले.**





मराठा आरक्षणासाठी लढा देणारे उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या शांतता रॅलीला हिंगोलीतून सुरुवात झाली आहे. हिंगोली, परभणी, नांदेडनंतर आता लातूरमध्येही मनोज जरांगे यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले आहे. लातूरमधील भाषणातून पुन्हा एकदा मनोज जरागें यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ओबीसी नेते छगन भुजबळ यांच्यावर निशाणा साधला. तसेच, बीडमधील शांतता रॅलीला पोलीस प्रशासनाने परवानगी नाकारली असली, तरीही बीडमध्ये शांतता रॅली काढणारच असल्याचा निर्धार जरांगे यांनी बोलून दाखवला. यावेळी, नाव न घेता पालकमंत्री धनंजय मुंडेंनाही लक्ष्य केले आहे. जरांगे यांनी लातूरमधील भाषणातून लोकसभा निवडणुकीतील पाडापाडीचे, मतांचे गणितही सांगितले आहे.

बीड जिल्ह्यातील मराठे ११ तारखेला, शहरातील मराठे, गावखेड्यातील ◀◀ पान २ वर

### जरांगेंनी मतांचे गणित सांगितले

» *मराठ्यांना जातीवादी म्हटल्यावर कसा कार्यक्रम लावला. मी तर केवळ पाडाच म्हटलो होतो, कुणाचे नावही घेतले नव्हते. पण, एक चूक आपल्याकडून झाली. कुणाला पाडायचे हे सांगितले नसल्यामुळे १० हजार मराठ्यांनी तिसऱ्यालाच मतदान केले. तर, २० हजार मराठ्यांनी मतदानच केले नाही. त्यामुळे, ३० हजार मतदान आमचे वाया गेले आहे, असे गणितही जरांगे पाटील यांनी लातूरमधून मांडल्याचे दिसून आले. कारण, कुणाचेही नाव न घेतल्यामुळे नेमके कुणाला पाडायचे हे काहींना समजले नाही, त्यामुळे ३० हजारांचे मतदान वाया गेल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.*

# भाजपला मराठवाड्यात आणखी एक दे धक्का

### माजी गृहराज्यमंत्र्यांकडून सोडचिठ्ठी, सर्वच पदांचा राजीनामा

**नांदेड । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकांच्या निकालानंतर भाजप पक्षांतील बड्या व ज्येष्ठ नेत्यांची खदखद बाहेर येत असल्याचे दिसून येत आहे. माजी केंद्रीय मंत्री सूर्यकांता पाटील, दोनच दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगरचे माजी महापौर राजू शिंदे यांनी भाजपला सोडचिठ्ठी दिली. आता, नांदेडमधील भाजपचे वरिष्ठ नेते आणि माजी गृहराज्यमंत्री डॉ. माधव किन्हाळकर यांनी भाजपला सोडचिठ्ठी दिली आहे. किन्हाळकर यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे आपल्या भाजप सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे.



गेल्या काही दिवसांपासून भाजपात काहीही आलबेल नसल्याचे दिसून येत आहे. भाजपने ◀◀ पान २ वर

### शरद पवारांच्या मंत्रिमंडळात होते मंत्री

***डॉ. माधव किन्हाळकर यांनी २०१४ मध्ये भोकर (विधानसभा मतदारसंघ) मधून अमिता अशोकराव चव्हाण यांच्या विरुद्ध भाजप उमेदवार म्हणून निवडणूक लढवली होती. त्यावेळी, ५३,२२४ मते मिळवून ते या निवडणुकीत पराभूत झाले होते. त्यांनी १९९१ ते १९९९ या कालावधीत भोकर मतदारसंघाच्या विधानसभेचे काँग्रेस सदस्य म्हणून काम केले. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र सरकारमध्ये १९९१ ते १९९५ या कालावधीत ते गृह व्यवहार, महसूल आणि सहकार राज्यमंत्री म्हणून कार्यरत होते.***

## हाथरस चेंगराचेंगरी प्रकरणी एसआयटीचा अहवाल सादर

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**उत्तर प्रदेशमधील बहुचर्चित हाथरस चेंगराचेंगरी प्रकरणी विशेष तपास पथकाने (एसआयटी) ने आपला ८५५ पानांचा अहवाल राज्य सरकारला सादर केला आहे. चेंगराचेंगरीची कारणे, अज्ञान आणि निष्काळजीपणा याला जबाबदार कोण? इतर तथ्ये अत्यंत गोपनीय ठेवण्यात आली आहेत.**



स्वयंघोषित आध्यामिक गुरु सूरज पाल सिंग उर्फ भोले बा३बा याच्या सत्संग कार्यक्रमानंतर झालेल्या चेंगराचेंगरीत फुलारी गावात १२१ लोकांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणाच्या चौकशीसाठी आग्रा विभागाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक अनुपम कुलश्रेष्ठ यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक होते. चेंगराचेंगरीची मूळ कारणे शोधण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या एसआयटीने आपला ८५५ पानांचा अहवाल सरकारला सादर केला आहे. एसआयटीने १३२ जणांचे जबाब नोंदवले. या अहवालात म्हटले आहे की, सत्संगाचे आयोजन करणाऱ्या समितीने परवानगीपेक्षा अधिक गर्दी केली होती. पोलीस ठाणे–तहसील ते काही जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांचे ◀◀ पान २ वर

## राज्यात दहा नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरू होणार


### वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांची माहिती

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यात १० नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्याचे शासनाचे प्रयत्न आहेत. मुंबई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास राष्ट्रीय वैद्यक परिषदेने ५० (एम.बी.बी.एस.) विद्यार्थी क्षमतेची परवानगी दिलेली आहे. उर्वरीत ९ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे अर्ज राष्ट्रीय वैद्यक परिषदेमार्फत दर्शविण्यात आलेल्या त्रुटी पूर्ण करण्यात येणार असल्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले.**




मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले की, शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ करिता गडचिरोली, जालना, वाशीम, हिंगोली, बुलढाणा, अमरावती, नाशिक, भंडारा, अंबरनाथ (जिल्हा ठाणे) आणि मुंबई येथे १०० विद्यार्थी क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ◀◀ पान २ वर





## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.९ जुलै २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ६.५० क्विंटल | २,२९० | २,२९० | २,२९० |
| ज्वारी/हायब्रिड : ५३.५० क्विंटल | २,१५१ | २,६८५ | २,३८८ |
| मूग : १.00 क्विंटल | ७,२७६ | ७,५०१ | ७,३८८ |
| तूर : १.00 क्विंटल | ७,८०१ | ८,४०० | ८,१०० |
| उडीद :०.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| बाजरी: ४.०० क्विंटल | २,६४७ | २,६४७ | २,६४७ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ८४.०० क्विंटल | ४,४०० | ४,५२५ | ४,४७० |
| हरभरा: २०.५० क्विंटल | ४,००० | ६,४४० | ५,२२० |

## दृष्टीदोष दाखवून पूजा खेडकर आयएएस, सहा वेळा वैद्यकीय चाचणीला नकार

**पुणे । प्रतिनिधी**

स्वतःच्या खासगी ऑडी गाडीवर लाल दिवा लावून फिरणाऱ्या आणि अवाजवी सरकारी सोईसुविधांची मागणी करत चमकोगिरी करणाऱ्या ट्रेनी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांचा आणखी एक कारनामा उघड झाला आहे.



पूजा खेडकर यांनी अपंग असलेले सर्टिफिकेट दाखवून यूपीएससीची परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दावा केला जातो आहे.


पूजा खेडकर यांनी व्हिज्युअली इम्पेअर्ड म्हणजे दृष्टीदोष ◀◀ पान २ वर

## गौतम गंभीर बनला टीम इंडियाचा मुख्य प्रशिक्षक

### बीसीसीआयकडून घोषणा

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षक म्हणून गौतम गंभीर याची नियुक्ती करण्यात आली आहे. बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी या बाबत अधिकृत घोषणा केली आहे. टीम इंडियाचा मुख्य प्रशिक्षकपदावरुन राहुल द्रविड टी २० विश्वचषकानंतर संपल्यानंतर निवृत्त झाले. राहुल द्रविड यांच्यानंतर भारतीय संघाची जबाबदारी गौतम गंभीरकडे देण्यात आली आहे. जय शाह यांनी गौतम गंभीर यांची भारताच्या मुख्य प्रशिक्षक पदी नियुक्ती ◀◀ पान २ वर





# दहाव्या दिवशी मुख्यमंत्र्यांसह विविध खात्याचे मंत्री गायब

### विधानसभेत विरोधक आक्रमक

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्याच्या पावसाळी अधिवेशनाचा शेवटचा आठवडा सुरू असून मंगळवारी (दि.९) विरोधकांनी आक्रमकपणा दाखवला. अधिवेशनाच्या १० व्या दिवशी अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यात येणार होती. मात्र यादरम्यान मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्री आणि सर्व खात्याच्या मंत्र्यांच्या अनुउपस्थिवरून विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये जुंपल्याचे पाहायला मिळाले.**



यावेळी विरोधी पक्षनेते बोलतना किमान मुख्यमंत्री नाही तर दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसह संबंधीत खात्याचे मंत्री आणि सचिवांची उपस्थिती हवी. पण मंत्री नाही तर सचिव देखील सभागृहात नसतात. या अधिकाऱ्यांना २०१४ पासून सरकारने डोक्यावर बसवून घेतल्याचा आरोप भास्कर जाधव यांनी केला. तर ज्या खात्याशी निगडीत चर्चा आहे, त्या मंत्र्यांची उपस्थिती पाहिजे, असे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले. यावेळी विरोधकांच्या ◀◀ पान २ वर

### अधिवेशाला मुदतवाढ मिळण्याची शक्यता

*राज्याचे पावसाळी अधिवेशन सुरू असून ते १२ जुलैला संपणार आहे. तर अजून अनेक विषयांवर चर्चा होणे बाकी आहे. त्यावरून सभागृहातील कामकाजाचे दिवस वाढवण्याची चर्चा सुरू आहे. याबाबत विधान परिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे यांनी माहिती दिली आहे. सोमवारी मुसळधार पावसामुळे अनेक आमदार आणि मंत्री सभागृहात पोहचू शकले नव्हते. त्यामुळे अधिवेशनाचे कामकाज १ दिवसासाठी तहकूब करण्यात आले होते. तर कामकाज अधिक असल्याने अधिवेशनासाठी २ ते ३ दिवसांची वाढ करण्याची मागणी होत आहे. त्यामुळे अधिवेशाचे दिवस वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.*

## अग्रलेख

# वैद्यकीय शिक्षणचा बाजार

देशातील सर्वात प्रतिष्ठित अभ्यासक्रमापैकी एक असलेल्या वैद्यकीय शिक्षणाला आता खूपच गंभीर स्वरूप आलेले आहे. नीट या पात्रता परीक्षेचा जो गोंधळ सध्या सुरू आहे त्यामुळे सर्वसामान्य पालक, विद्यार्थी वर्ग हतबल झाला आहे. सर्वोच्च न्यायालय काय निकाल देणार आणि त्याचा आपल्या भवितव्यावर काय परिणाम होणार याचीच चिंता २४ लाख कुटुंबांना लागली आहे. पेपरफुटी आणि गुणवाढ अशा दोन प्रकरणात तळापर्यंत जाऊन तपास झाल्यास सर्वोच्च न्यायालयाला निकाल देणे सोईचे होईल. सोमवारी सायंकाळपर्यंत सुनावणी घेतल्यानंतर न्यायालयाने अखेर एनटीएला अनियमिततेचा फायदा घेतलेल्या उमेदवारांची माहिती देण्यास आणि सीबीआयला तपासाचे अपडेट देण्यास सांगितले आहे. त्याचबरोबर एनटीएमध्ये सुधारणा करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या तज्ञ समितीबाबत केंद्र सरकारकडून माहिती मागवली आहे. फेरपरीक्षेची मागणी करणाऱ्या याचिकाकर्त्यांकडून जास्तीत जास्त १० पानांचा एकत्रित अहवाल मागवण्यात आला आहे. त्यानुसार कोर्ट पुढील सुनावणी घेणार आहे.

याचिकाकर्त्यांनी प्रणालीच्या पातळीवर चूक आढळल्यास संपूर्ण परीक्षेचे पावित्र्य धोक्यात येईल. चुकीच्या मार्गाने रँक मिळालेल्यांची ओळख पटत नाही, असे म्हटले असून सर्वोच्च न्यायालयाने आम्ही चुकीच्या पद्धती वापरणाऱ्या एकाही उमेदवाराला पुढे जाऊ देणार नाही, असे आश्वस्त केले आहे. त्यासाठी पेपर तयार करणे, त्याची छपाई, छापखान्यांची वाहतूक व्यवस्था, पेपर किती दिवस आधी पाठवले, विदेशात पाठवलेले पेपर किती सुरक्षितपणे पाठवले गेले अशा बारीक सारीक गोष्टींचा तपास करून कोणत्या पातळीवर पेपर फुटला आणि तो विद्यार्थ्यांना कसा पोहोचवला, समाज माध्यमांवर हा टाकला की मुठभर लोकांनाच मिळाला हे सगळे स्पष्ट करण्याचे आदेश कोर्टाने दिले आहेत. त्यामुळे सुनावणी आता ११ जुलैला होईल. प्रतिष्ठित शिक्षण संस्थांमध्ये आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये गुणवत्तेवर शिक्षण घेऊन डॉक्टर होण्याचे स्वप्न बाळगणाऱ्यांना आता पुन्हा वाट पहायची आहे. नीट परीक्षा पुन्हा घ्यावी तर त्याला केंद्र सरकार तयार नाही आणि आहे त्या स्थितीत बहुसंख्येने शिक्षणाचा निर्णय घ्यावा तर तेवढ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची व्यवस्था आपल्याकडे नाही. हे जळजळीत सत्य या निमित्ताने अधिक दाहक झाले आहे.

पेपर फुटला कसा, तो किती गतीने किती लोकांपर्यंत पोहोचला आणि त्याचा नेमका परिणाम निकालावर कसा झाला, पेपर फुटिशी टॉपर विद्यार्थ्यांपैकी कोणाचा संपर्क असल्याचे तपासात पुढे आले आहे काय? या आणि अशाच गुंतागुंतीच्या प्रश्नांची उकल केल्यावरच न्यायालयाला निकाल देणे सोपे होणार आहे. या पातळीवर विचार केला तर कोणतीही गडबडी झाली नाही असे म्हणणारा एनटीए आणि सहापेक्षा अधिक राज्यात गुन्हे दाखल करून तपास करणाऱ्या सीबीआयच्या सांगण्यात एकवाक्यता नाही, हे उघड झाले आहे. परिणामी सर्वोच्च न्यायालयाने कुणाचे म्हणणे मान्य करायचे? परीक्षा घेणाऱ्या एनटीएचे की सीबीआयचे? पेपर फुटी आणि गुण बहाली हे असे मुद्दे आहेत, ज्यावर पुढेही चर्चा सुरू राहील. पोलिसांचे तपास सुरू राहतील, बरेच काही हाती लागले असे भासवले जाईल आणि जेव्हा निकालाची वेळ येईल तेव्हा तपास यंत्रणा आणि कोर्टात काय सांगितले त्याचा पंचनामा करण्याची वेळ न्यायालयावर येईल. अशी या सगळ्या प्रकरणाची ख्याती आहे. हा निकाल सर्वांच्यासाठीच उत्कंठावर्धक ठरत आहे. या निकालाने यावर्षीचा प्रश्न निकाली निघाला तरी प्रत्येक वर्षीची कार्यपद्धती त्यातून निश्चित होईल का? हा शंकेचाच विषय आहे. पुन्हा कोणीतरी नवे चोर नवे आव्हान उभे करतील. त्याला तोंड कसे द्यायचे याची सरकारची तयारी काय आहे हे आतापर्यंत सरकारी यंत्रणांकडून जाहीर होण्याची गरज होती. प्रत्यक्षात आपल्याच खंदकात आपण रुतून बसलो आहोत, मेडिकलच्या जागा कमालीच्या वाढवण्याचा आपण विचारही करत नाही आणि आरोग्यावर अर्थसंकल्पाच्या अडीच टक्के खर्चाची कुठल्याही सरकारची तयारी नाही. भारतात शासकीय महाविद्यालयात परवडणाऱ्या शिक्षणासाठी प्रवेश नाही आणि केवळ पदवीसाठी सव्वा कोटीपर्यंत खर्च करण्याची ऐपत नाही, प्रवेश नाही म्हणून २०२२ मध्ये एकूण ७ लाख ५० हजार ३६५ विद्यार्थी भारतातून विदेशात वैद्यकीय शिक्षणासाठी गेले आहेत. २०21 च्या तुलनेत ही वाढ ६९ टक्के इतकी आहे. रशिया, युक्रेन युद्ध सुरू झाले तेव्हा जॉर्जिया, युक्रेन, रशियासह तशाच बर्फाळ प्रदेशात डॉक्टर होण्यासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांची मोठी संख्या आपल्या ध्यानात आली. वरून आपल्या धुरिणांनी या विदेशात डॉक्टर झालेल्या विद्यार्थांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर प्रश्न उपस्थित केला. वास्तवात भारतात शासकीय, खासगीकरण किंवा आयआयएम सारख्या उच्च संस्थानांत विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी पुरेसे प्राध्यापक नाहीत, गुणवत्ता हा तर त्याहून खूप पुढचा प्रश्न आहे. वास्तविक भारतात प्रतीहजारी जागतिक संख्येच्या पुरेशा प्रमाणात आपल्याकडे डॉक्टर आहेत असे छातीठोकपणे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात वास्तव कोरोनात उघडे पडले आहेच. शिवाय ग्रामीण भारतात डॉक्टरांचा तुटवडा खूप मोठ्या प्रमाणात जाणवतो आहे. विद्यार्थ्यांची संख्या प्रचंड आणि त्या प्रमाणात शिक्षणासाठी जागा उपलब्ध नसल्याने हा प्रश्न अधिक तीव्र होत चालला आहे. कोरोना काळात शासकीय वैद्यकीय व्यवस्था बळकट असणे किती गरजेचे आहे हे उघड झाले असताना सरकारने काही विभागातील अनावश्यक खर्चाला कात्री लावून वैद्यकीय शिक्षणाच्या जागा कमालीच्या वाढवणे आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करणे हे काम हाती घेतले तर यातील बऱ्याच गैरप्रकारांना लगाम बसेल. निदान डॉक्टरकिचा बाजार तरी थांबेल.

## हैद्राबादहून आणलेल्या आरोपीचे रुग्णालयातून पलायन, चांगल्या कामगिरीला गालबोट

मुखेड । प्रतिनिधी

**हैद्राबाद येथून बाल लैंगिक अत्याचारातील पकडून आणलेल्या आरोपीने काल(दि.८ रोजी) उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करीत असताना पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पसार झाला. ही घटना सोमवारी सायंकाळी ६ च्या दरम्यान घडली. मुखेडचे पोलीस उपनिरीक्षक मंचक फंड यांनी मेहनत घेऊन दोनच दिवसात आरोपिच्या मुसक्या आवळून मुखेडला आणले होते व चांगले काम केले होते परंतु थोड्याच असावधानतेमुळे नामुष्कीची वेळ ओढावली आहे.**

मुखेड येथील परमेश्वर मष्णाजी टाळीकोटे याने एका अल्पवयीन मुलीस फूस लावून पळविल्याप्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी पोलिसांनी तपास केला असता यातील आरोपी हैदराबाद येथे असल्याची माहिती मिळाली. पोलिसांचे पथक ७ जुलै रोजी हैद्राबाद येथे गेले होते. तेथून पोलिसांनी आरोपी परमेश्वर टाळीकोटे व मुलीस ८ जुलै रोजी पहाटे २ वाजता पकडून आणले होते. आरोपीला सोमवारी सायंकाळी ६ वा. उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी पोलिस उपनिरीक्षक मंचक फड व एक पोलिस शिपाई यांनी आणले. या ठिकाणी वैद्यकीय तपासणी करताना त्याची हातकडी काढण्यात आली होती. त्यावेळी वैद्यकीय तपासणी होताच सदर आरोपीने झटका मारून उपजिल्हा रुग्णालयातील खोली क्रमांक १६ मधून पळून गेला. पळालेल्या आरोपिस लवकरच अटक करु असे पोलिस निरीक्षक लक्ष्मणराव केंद्रे यांनी सांगितले.

## आवश्यक त्या उपाययोजना करा- आ.संदीप क्षीरसागर

### पावसामुळे इतर ठिकाणसारखी परिस्थिती बीडची होऊ नये

बीड । प्रतिनिधी

**पहिल्याच पावसाने मुंबई तसेच राज्यातील अनेक ठिकाणी अतिवृष्टीमुळे अक्षरशः आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली आहे. या अनुषंगाने आपल्या बीड शहरात आवश्यक त्या उपाययोजना करून, इतर ठिकाणसारखी परिस्थिती बीडमध्ये होणार नाही याची काळजी घ्या. अशा सुचना आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड नगरपालिकेला दिल्या आहेत.**



मागील दोन दिवसात मुंबईमध्ये पावसाने धुमाकूळ घातला आहे. मुसळधार पावसाने मुंबई सारखे देशातील मोठे आणि अद्ययावत शहर ठप्प होत आहे. राज्यातील अनेक भागांमध्ये जनजीवन विस्कळित झाले आहे. हवामान खात्याने वर्तविलेल्या अनुषंगाने राज्यभर सर्वत्र अशी अशी परिस्थिती उद्भवू शकते आणि अर्थातच आपल्याकडेही होऊ शकते. त्यामुळे आपणही आपल्या बीड शहरात तुंबलेल्या गटार, नाल्यांची स्वच्छता करून प्रवाहित करणे, धोकादायक विद्युत पोल आणि तारा यांबाबत महावितरण विभागाला सूचित करुन दुरूस्ती करून घ्यावी. तसेच शहरातील मुख्य व अंतर्गत रस्त्यावर ज्या ठिकाणी पाणी साचते अशा ठिकाणी मुरुम टाकणे व तत्सम उपाय करणे. तसेच पावसाळ्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व उपाययोजना करून दक्षता आणि काळजी घ्यावी. बीड शहरात विविध ठिकाणी रस्त्याची कामे तसेच इतर विकासकामे सुरू आहेत. त्यामुळे याठिकाणांवर पाणी साचून राहू शकते या अनुषंगानेही नियोजन करा. असे आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड नगरपालिका मुख्याधिकारी तसेच संबंधित अधिकारी यांना सूचित केले आहे.

### स्मशानाभुमीतील दुरूस्ती करण्याच्या सुचना

दरम्यान, शहरातील मोंढा रोडवरील अमरधाम, बार्शी रोडवरील संत भगवानबाबा प्रतिष्ठाण जवळील स्मशानभूमी तसेच अंकुश नगर भागात असलेली स्मशानभूमी या शहरातील प्रमुख स्मशानभूमींची देखभाल आणि दुरुस्ती करा. येथील क्रेमिंग चेंबर (शव दाहिका) नादुरुस्त असल्याचे आढळले असून हे लवकरात दुरूस्त करा. तसेच परिसरातील आवश्यक ठिकाणी स्वच्छता आणि दुरुस्ती करण्याच्या सुचनाही आ.संदीप क्षीरसागरांनी नगरपालिकेला दिल्या आहेत.

## जांभळं तोडणाऱ्या विद्यार्थ्याला मौलानाने केली गंभीर मारहाण

दिंद्रुड । प्रतिनिधी

**शाळेतून घरी आल्यानंतर जांभळं तोडण्यासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांना शिवणकाम करणाऱ्या एका मौलवी कडून जबर मारहाण करण्यात आली. यात एक विद्यार्थी गंभीर जखमी झाला असून त्यास बीडच्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सदरील घटना माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे काल दि.०८ सोमवारी सायंकाळी घडली. जखमी विद्यार्थ्यांच्या आईच्या फिर्यादीवरून दोन व्यक्तींवर दिंद्रुड पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याप्रकरणी एकास अटक करण्यात आले असून एकजण फरार झाला आहे.**



येथील माध्यमिक विद्यालयात शिकणाऱ्या तेजस नवनाथ कटारे व रत्नेश्वर रुस्तुम ठोंबरे या १३ वर्षीय विद्यार्थ्यांनी शाळा सुटल्यानंतर गावातील जिल्हा परिषद शाळेच्या बाजूला महेबूब सूभानी दर्गा जवळ असलेल्या जांभळीचे जांभळं पाडत असताना तेथील मौलाना मुजीब मुज्जिद शेख मुळ रा.वरफळ ता.परतूर जि.जालना (ह.मु. दिंद्रुड) व समीर अत्तार कासम (रा.दिंद्रुड) या दोघांनी काठीने बेदम मारहाण केली. या मारहाणीत तीन विद्यार्थी जखमी असून, भितीपोटी एक विद्यार्थी पळून गेला. या मारहाणीत मौलाना ने तेजस च्या डोक्यात काठीने गंभीर जखमी करून गळा दाबून जीवे मारण्याचा प्रयत्न केला असून रत्नेश्वर ठोंबरे हा किरकोळ जखमी झाला आहे. तेजस ची आई वंदना कटारे यांच्या फिर्यादीवरून दिंद्रुड पोलिसात गु.नं.१४२/२०२४ नुसार कलम १०९, ११८(१), ३(५) (बी एन एस) भादवी प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. असून पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. बी धीरज कुमार, सपोनि सुदाम शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राजेभाऊ राठोड करत आहेत. दरम्यान समाजात मौलवी म्हणून मिरवणाऱ्या जबाबदार व्यक्तीने लहान मुलांना गंभीर मारहाण केल्याने गावकऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. या मारहाणीत मौलाना ने तेजस कटारे च्या डोक्यात काठीने गंभीर जखमी करून गळा दाबून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. तेजसच्या डोक्याला खोलवर दुखापत असल्यामुळे डॉक्टरांनी सिटीस्कॅन करून त्याला डॉक्टरांच्या निगराणीत ठेवले आहे. बीड येथील शासकीय रुग्णालयात सध्या तेजस वर उपचार चालू आहेत.

## धारूर शहरात डेंगूच्या रुग्णांची संख्या वाढली आरोग्य विभागाने लक्ष देण्याची गरज

किल्ले धारूर। प्रतिनिधी

**पावसाळा सुरू झाल्यापासून डेंगू च्या रुग्णांची संख्या वाढू लागली आहे धारूर शहरातील नाथनगर व हनुमान गल्ली या परिसरामध्ये डेंगू च्या आजारात असलेल्या रुग्णांची दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे दिसून येत आहे नगर परिषदेने यावर प्रतिबंधक उपाययोजना म्हणून तात्काळ या भागात स्वच्छता व धूर फवारणी करणे आवश्यक आहे.**

### आजाराचे गांभीर्य लक्षात घेता नगर परिषदेने तातडीने शहराच्या स्वच्छते विषयी उपायोजना राबवाव्यात

पावसाळा सुरू झाला की डासांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढते यामध्ये काही डास हे डेंगू सारख्या भयंकर आजाराला कारणीभूत ठरतात असे

नागरिकांनी आपल्या आसपासचा परिसर स्वच्छ ठेवावा पाण्याची साठवूनक जास्त दिवस करून ठेवू नये स्वच्छ पाण्यात डेगुचे डास निर्माण होतात थंडी ताप असल्यास वेळीच वैद्यकीय उपचार घ्यावेत. लहान मुलांना घानी मध्ये खेळण्यास जाऊ देऊ नये,वयस्कर व्यक्तींनी गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे,मच्छरदानी चा वापर करावं.

**-डॉ.नवनाथ चव्हाण.**



चावल्यामुळे डेंगू होऊन रुग्ण दगावण्याची शक्यता असते त्यामुळे वेळीच यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे धारूर शहरांमध्ये नगर परिषदेच्या वतीने धूर फवारणी व स्वच्छते विषयक जनजागृती करणे गरजेचे आहे दहा ते बारा डेंगू आजाराचे रुग्ण शहरात मागील काही दिवसात आढळून आले ,शहरातील नाल्याची साफसफाई करणे व लोकांमधे जनजागृती करणे गरजेचे आहे या बाबत नगर परिषदेने गांभिर्याने घेऊन तातडीने उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे.

## पान १वरून...

### मनोज जरांगेंकडून धनंजय

मराठे घराला दारं-कुलपं लावून रॅलीला येणार आहेत. म्हाताऱ्या माणासांपासून लेकरं, नोकरदारसुद्धा घरी राहणार नाहीत. फडणवीस साहेब आणि अजित पवार यांच्या सांगण्यावरुन बीडच्या पालकमंत्र्यांनी तिथल्या एसपीला सांगून तिथली रॅलीची परवानगी रद्द केली. तरीही सांगतो, बीडची रॅली बीडमध्ये शांततेत होणार... असे म्हणत बीडमध्ये ११ जुलै रोजी शांतता रॅली होणारच असे जरांगे यांनी ठणकावून सांगितले. यावेळी, अप्रत्यक्षपणे त्यांनी धनंजय मुडेंवर निशाणाही साधला. बीडच्या पालकमंत्र्यांना असला जातीवाद शोभत नाही, आम्ही नाही कधी जातीवाद केला. ५-५ पिड्या तिथल्या मराठ्यांनी तुम्हाला मोठे करायचे काम केले, आम्ही जातीवादी नसून आमच्या लेकरांसाठी आम्ही एकत्र आलो आहोत. फडणवीस साहेबांना माझा ६ वा सवाल आहे, आत्तापर्यंत ओबीसींच्या नेत्यांना निवडून दिले आहे, ओबीसींना एकगठ्ठा मतदान केले आहे, आम्ही कधीही ओबीसींना जातीवादी नाही म्हटले आहे. आम्ही असं म्हणलो, तुमची जात एकत्र आहे राव, आमची जात कवा एक होईल. पण, आमची जात एकदा एकत्र आली तर तुमची भयानक पोटं दुखायला लागली. आम्ही एकगठ्ठा मतदान केलं तर आम्ही जातावादी, पण तुम्ही एकगठ्ठा मतदान केलं तर जातीवाद नाही?, व्वा रे नाय.. असे म्हणत मनोज जरांगे यांनी नाव न घेता ओबीसी नेत्यांवर हल्लाबोल केला.

-----------

### मिहीर शाहाला अटक

आठ टीम होत्या. पोलिसांनी मिहीर शाह आणि त्याला मदत करणाऱ्या इतर १२ जणांना अटक केली आहे. मिहीर शाहने अपघातावेळी मद्यपान केले होते का, अपघातावेळी नेमकं काय घडले याबद्दल अधिकची माहिती आता पोलिस घेणार आहेत. या आधी पोलिसांनी मिहीर शाहाच्या मैत्रिणीचा जबाब नोंदवला होता. तसेच आरोपीचे वडील राजेश शाह आणि ड्रायव्हर राजऋषी सिंहला पोलिसांनी अटक केली होती. पण राजेश शाहाला जामीन मिळाला आहे.

----------

### राज्यात दहा नवीन शासकीय

सुरु करण्याकरिता राष्ट्रीय वैद्यक परिषद, नवी दिल्ली यांना अर्ज सादर करण्यात आले होते. पुढे बोलताना हसन मुश्रीफ म्हणाले की, त्रुटींची पूर्तता करण्याची कार्यवाही शासन व संचालनालय स्तरावर सुरु आहे. अध्यापकांची पदे भरण्याची कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे सुरु असून, वैद्यकीय महाविद्यालयाची ईमारत आणि संलग्रित रुग्णालय या संदर्भातील कार्यवाही पूर्ण झालेली आहे. तसेच काही अध्यापकांची पदे कंत्राटी, मानधनावर भरण्यात येणार आहेत. त्रुटी दर्शविलेल्या प्रस्तावित ९ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांकरिता राष्ट्रीय वैद्यक परिषद, नवी दिल्ली यांच्याकडे शासनामार्फत अपील दाखल करण्यात येणार असल्याचे त्यानी स्पष्ट केले. या अपिलाच्या सुनावणीस शासनाकडून त्रुटी पूर्ततेसंदर्भातील हमीपत्र सादर करुन या महाविद्यालयांना परवानगी प्राप्त करण्याच्या अनुषंगाने योग्य ते प्रयत्न करण्यात येत आहेत. सध्या नीट-यूजी-२०२४ ची परीक्षा पुढे गेली असल्यामुळे सदर ९ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना परवानगी प्राप्त करुन घेऊन या शैक्षणिक वर्षी एम.बी.बी.एस. प्रथम वर्षाचे प्रवेश करण्यासाठी शासनस्तरावरुन प्रयत्न सुरु असल्याचीही माहिती त्यांनी दिली.

-------------

### हाथरस चेंगराचेंगरी प्रकरणी

या कार्यक्रमाकडे दुर्लक्ष झाल्याचेही समोर आले आहे. एसआयटीच्या अहवालात अनेक अधिकारी आणि आयोजकांना जबाबदार धरण्यात आले असल्याचे सांगण्यात येत आहे. चेंगराचेंगरीची कारणे, अज्ञान आणि निष्काळजीपणा याला जबाबदार कोण? इतर तथ्ये अत्यंत गोपनीय ठेवण्यात आली आहेत. प्रत्यक्षात एसआयटीचा अहवाल शनिवार, ६ जुलै रोजीच तयार झाला. रविवारी दिवसभर याचे टायपिंग सुरूच होते. त्यात सोमवारी सकाळी काही सुधारणा करण्यात आल्या. त्यानंतर सायंकाळी उशिरा हा अहवाल विशेष दूताद्वारे विशेष देखरेखीखाली शासनाकडे पाठविण्यात आला. दरम्यान, अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश ब्रिजेश कुमार श्रीवास्तव आणि निवृत्त आयपीएस अधिकारी हेमंत राव यांच्या नेतृत्वाखालील स्वतंत्र न्यायिक आयोगही हाथरस चेंगराचेंगरी प्रकरणाची चौकशी करत आहे.

-------------

### भाजपला मराठवाड्यात

शिवसेनेसोबत सत्ता स्थापन केल्यानंतर अजित पवारांसह राष्ट्रवादीलाही सोबत घेतले. त्यामुळे, भाजपमधील काही नेते नाराज असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा असते. आता, भाजपमधील नाराजी उघडपणे समोर येत आहे. नांदेड जिल्ह्यात गेल्या महिनाभरात झालेल्या दोन नेत्यांच्या राजानाम्यामुळे भाजपला मराठवाड्यात धक्का बसल्याचे स्पष्ट झाले आहे. सूर्यकांता पाटील यांनी भाजप सोडल्यानंतर खासदार अशोक चव्हाणांवर टीका केली होती. त्यानंतर, आता माजी गृहराज्यमंत्री डॉ. माधव किन्हाळकर यांनी आज भाजपच्या सर्व पदांचा राजीनामा दिला आहे. माधव किन्हाळकर यांच्याकडे भोकर मतदारसंघाची जवाबदारी होती. त्यामुळे, सूर्यकांता पाटील यांच्यानंतर हा भाजपसाठी दुसरा धक्का मानला जात आहे.

-----------------

### गौतम गंभीर बनला टीम

झाल्याची घोषणा करताना आनंद होत असल्याचे म्हटले आहे.

गौतम गंभीर यांचे भारताचे मुख्य प्रशिक्षक म्हणून स्वागत करत आहे. आधुनिक क्रिकेट वेगानं विकसित होत आहे. गौतम गंभीर या बदलांचा साक्षीदार आहे. गौतम गंभीरने त्याच्या कारकिर्दीत अनेक जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. विविध पदांवर काम केले आहे. गौतम गंभीर भारताच्या प्रशिक्षक पदासाठी योग्य व्यक्ती आहे. तो भारताचे क्रिकेट पुढे नेईल, असे जय शाह म्हणाले. गौतम गंभीर यांच्याकडे भारतीय क्रिकेट संघासाठी स्पष्टपणे व्हिजन आहे. याला गौतम गंभीरच्या प्रदीर्घ अनुभवाची आणि विविध पदांवर काम केल्याची जोड देखील आहे. यामुळे भारताच्या मुख्य प्रशिक्षक पदावर काम करण्यासाठी गौतम गंभीर योग्य ठरतो. बीसीसीआयचा गौतम गंभीरला पुढील प्रवासासाठी पूर्ण पाठिंबा असल्याचहो जय शाह म्हणाले.

---------

### दृष्टीदोष दाखवून पूजा खेडकर आयएएस,

असल्याचे सर्टिफिकेट दाखवून आएएस पदरात पाडून घेतल्याची माहिती आहे. यूपीएससीने सहा वेळा दिल्लीच्या एम्समध्ये वैद्यकीय चाचणीसाठी बोलावूनही त्या गेल्या नाहीत. कुठल्यातरी सेंटरमधून त्यांनी एमआरआय अहवाल मिळवला आणि त्या आधारे त्या कलेक्टर झाल्याचं सांगितलं जातंय. त्यामुळे पूजा खेडकर यांचे कलेक्टर बनणे हेच वादग्रस्त ठरण्याची शक्यता आहे. पूजा खेडकरांचे आएएस पद वादाच्या भोवऱ्यात सापडण्याची शक्यता आहे. यूपीएससी आणि कॅटने विरोध केला असतानाही त्यांना आयएएस पद कसे देण्यात आले? त्यांच्या नियुक्तीमागे कुठल्या राजकीय नेत्याने आपले वजन वापरले? असे प्रश्न आता विचारले जात आहेत.

-------------

### दहाव्या दिवशी मुख्यमंत्र्यांसह

आक्षेपावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, आपण येथे उपस्थित असून अर्थसंकल्प सादर केला आहे. त्यामुळे सभागृहात चर्चा करावी अशी विनंती केली. तर विरोधकांच्या आक्षेपावर गिरीश महाजन यांनी जोरदार पलटवार करताना याच्या आधी देखील असेच कामकाज चालत असल्याचे म्हटले. यावरून जोपर्यंत मंत्री येत नाहीत तोपर्यंत सभागृह तहकूब करावे, अशी मागणी जयंत पाटील यांनी केली. यावरून सत्ताधारी आणि विरोधक आमने-सामने आले होते. वडेट्टीवारांनी यावेळी सत्ताधाऱ्यांना फैलावर घेत, आम्ही प्रश्नोत्तरांची यादी काढली असून तेथे आरोग्य मंत्र्यांचे काय काम? असा सवाल केला. तर अध्यक्षांनी १० मिनिटांसाठी सभागृह स्थगित करावे, अशी मागणी वडेट्टीवार यांनी करताना, सभागृहाला सध्या गांभीर्य दिसत नसल्याची खंतही वडेट्टीवार यांनी व्यक्त केली. दरम्यान, विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशनाला सुरूवात होण्याआधी विरोधकांनी विधानसभेच्या पायऱ्यांवर सरकारविरोधात जोरदार आंदोलन केले. भ्रष्टाचार आणि क्लीन चीट देण्यावरून विरोधकांनी भाजपवर निशाना साधला. तर भाजपच्या वॉशिंग मशीनमध्ये नेत्यांना स्वच्छ करून क्लीन चीट दिली जाते, असा आरोप विरोधकांनी सकाळी विधानभवनाच्या पायऱ्यांवर केला.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. १० जुलै २०२४


## दुध उत्पादक शेतकऱ्यांनी गाय दुधासाठी प्रति लिटर रुपये ५/- अनुदानाचा लाभ घ्यावा

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक हित जोपासण्यासाठी दुध खरेदी दराच्या चढ उतारामुळे निर्माण झालेल्या परिस्थीतीत दुध उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या अनुषंगाने राज्यातील सहकारी दुध उत्पादक संघ खाजगी प्रकल्प यांना गाय दुध पुरवठा करणाऱ्या दूध उत्पादकांना प्रति लिटर रुपये ५/- अनुदान व दूध भुकटी निर्यातीस रू.३० प्रती किलो प्रोत्साहानपर अनुदान देण्याबाबतचा शासन निर्णय दि. ५.०७.२०२४ रोजी निर्गमीत करण्यात आला आहे. त्यानुसार सदर अनुदान योजना दि. ०१ जुलै २०२४ ते दि.३० सप्टेंबर २०२४ या कालावधीसाठी पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागामार्फत संयुक्तरित्या राबविण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने संबंधीत संघ व खाजगी प्रकल्प यांनी ३.५ फॅट /८.५ एस.एन.एफ. या गणप्रतिच्या दुधासाठी प्रति लिटर ३०/- रुपये दर देणे आवश्यक आहे, ३.५/८.५ या गुणप्रतिपेक्षा कमी /जास्त होणाऱ्या फॅट व एस. एन.एफ. साठी प्रत्येकी ३० पैसे वाढ/ वजावट करणे आवश्यक आहे.

# नऊ दिवसांपासून सुरू असलेले धनगर समाजातील चार युवकांचे उपोषण खा. सोनवणे यांच्या मध्यस्तीने स्थगित

**केज । प्रतिनिधी**

मागील नऊ दिवसा असून धनगर समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करण्यात यावा. या मागणीसाठी बीड जिल्ह्यातील केकतसारणी तालुका केज येथे चार युवकांनी पाण्याच्या टाकीवर चढून आमरण उपोषण सुरू केले होते. तर एका तरुणाने आत्महत्येचा देखील प्रयत्न केला होता. त्या उपोषणाला खा. बजरंग सोनवणे यांनी भेट देवून त्यांच्या मागणी संदर्भात संसदेत आवाज उठविण्याची आश्वासन दिल्या नंतर अखेर नवव्या दिवशी त्यांचे उपोषण स्थगित करण्यात आले आहे.

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील केकतसारणी येथे धनगर समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करून त्यांना स्वतंत्र आरक्षण देण्यात यावे. या मागणीसाठी अनंत धायगुडे, संदीपान धायगुडे, अंकुश मनाडे, महादेव नरवटे या तरुणांनी १ जुलै पासून गावातील




पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईलने उपोषण सुरू होते. त्यांच्या उपोषणाला नऊ दिवस झाले असल्याने उपोषणार्थी यांची प्रकृती खालावली होती. मात्र जो पर्यंत सरकार धनगर समाजातील नेत्यांशी चर्चा करून एस टी प्रवर्गात समावेश होत नाही तो पर्यंत उपोषण सुरू राहणार आहे असा त्यांनी पवित्रा घेतला होता. तर या मागणीसाठी अजय शिंदे या तरुणाने उपोषण सुरू असलेल्या पाण्याच्यां टाकीवरून उडी मारण्याचा देखील प्रयत्न केला होता. त्या नंतर अजय शिंदे याने पुन्हा घरातील आडूला गळफास घेतला होता. परंतु सुदैवाने तो सध्या वाचला आहे. दरम्यान आज दि. ९ जुलै रोजी खा बजरंग सोनवणे यांनी केकेत सारणी येथे जावून उपोषणर्थी यांची भेट घेवून त्यांच्याशी संवाद साधला आणि धनगर समाजाला एस टी प्रवर्गात समावेश करण्यासाठी माहविकास आघाडीचा संसद सदस्य म्हणून संसदेत प्रश्न उपस्थित करून कायम आंदोलनकर्त्या सोबत असल्याचे आश्वासन दिले. खा. बजरंग सोनवणे यांच्यावर धनगर समाजातील उपोषणार्थी यांनी विश्वास व्यक्त करून उपोषण स्थगित केले आहे.

## लोकशाहीर डॉ.आण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्या निवडी जाहीर



**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरात प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी साहित्यरत्न डॉ.आण्णाभाऊ साठे यांच्या सार्वजनिक जयंतीचा सोहळा १ ऑगस्ट रोजी शहरात साजरा होणार आहे. शहरातील'' पंचशील नगर ''सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांच्याकडून यावर्षीची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यावेळी साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या अध्यक्षपदी पंचशील नगर येथील आर. के. कंपनीचे संस्थापक अध्यक्ष रुद्रा भैया कासार तर सचिवपदी गोटू लांडगे तर उपाध्यक्षपदी अमोल गावडे यांची सर्वानुमते दि .८ रोजी झालेल्या पंचशील नगर येथे दिपक आणा आलझेंडे, बाळू साळवे, अमोल आलझेंडे,आनंद साळवे, कच्छिद्र कांबळे, अशोक साबळे, विशाल गणकवार, अतुल आलझेडे, धम्मा गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक पार पडली. यावेळी सदरील निवडी सर्वानुमते जाहीर करण्यात आल्या.

या वेळी पांडू अवचार, डेव्हिड टाकनखार, भरत भिसे, संजय सुतार, आकाश गालफाडे, करणं आलझेंडे, अमर भिसे, आकाश टाकनखार, राधे कासार, कुमार साळवे, मच्छिंद्र कासार, गोविंद फुलवरे, स्वप्नील टाकणखार, प्रितम साळवे, कृष्णा साळवे, रोहीत पौळ, जय सुतार, सुनिल आलझेंडे, विजय सुतार, लखन फुलवरे, अरबाज चाऊस, अशोक सकट, नितीन वैरागे, आकाश शिरसगर, सूरज कांबळे, बंटी डोंगरेसह पंचशीलनगर येथील नागरिक उपस्थित होते .

पान ६ वरून...

### इनरव्हील क्लब तर्फे

सत्कारमूर्तीवर जबाबदारी वाढत असते ते पेलण्याचे सामर्थ्य अशा गौरव सोहळ्यातून येत असते. इनरव्हील क्लबने ही सामाजिक बांधिलकी पाळत हा प्रातिनिधिक सत्कार केल्याबद्दल डॉ.इंगोले यांनी क्लबचे आभार मानले. तर डॉ.अरूणा केंद्रे यांनी आपल्या भाषणात बोलताना समाजात समाजासाठी कार्य करणारे अनेक उत्तुंग व्यक्तिमत्व असतात. त्यांना प्रेरणा, चालना व ऊर्जा देण्यासाठी त्यांच्या कार्याचा कुठे तरी गौरव व्हावा म्हणून अशा प्रकारच्या सकारात्मक प्रोत्साहनाची गरज असते आणि इनरव्हील क्लबच्या माध्यमातून झालेला हा सत्कार आम्हाला अजून चांगल्या पद्धतीने सामाजिक कार्य करण्यासाठी प्रेरक ठरेल असे मत व्यक्त केले. डॉ.राजश्री धाकडे यांनी एक अप्रतिम कविता सादर करत उपस्थितांची दाद मिळविली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इनरव्हील क्लबच्या नूतन अध्यक्षा निवृत्त मुख्याध्यापिका सुरेखा सिरसट यांनी केले. आभार प्रदर्शन कल्पना शिंदे तर बहारदार सूत्रसंचालन माजी अध्यक्षा सुनिता कात्रेला यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संगिता नावंदर, भावना कांबळे, जयश्री कराड, सुरेखा कचरे, जयश्री लव्हारे, वर्षा देशमुख, तन्वी कळमकर, माजी मुख्याध्यापिका चंद्रकला देशमुख, जयश्री कराड यांनी प्रयत्न केले.

### मुसळधार पावसाचा तडाखा

करावा लागत आहे. रस्ता काम करताना कडा येथील मोठ्या पुलाचे काम सुरू असल्याने रहदारीसाठी पर्यायी व्यवस्था म्हणून येथील स्मशानभूमीजवळ मातीचा भराव व त्याखाली नळकांड्या टाकून पूल करण्यात आला होता. सोमवारी रात्री झालेल्या दमदार पावसाने कडीनदीला पाणी आल्याने हा पर्यायी पूल रात्री उशिरा वाहून गेल्याने संपर्क तुटला आहे. तर आष्टीवरून कड्याला आणि नगरवरून कड्यामार्ग येणाऱ्या वाहनधारकांनी पर्यायी रस्त्याचा अवलंब करावा असे आवाहन तहसीलदार प्रमोद गायकवाड यांनी केले आहे.

### सिद्धेश्वर महाविद्यालयास ११ व

व्यवस्थापन मंडळा सोबत ते चर्चा करणार आहेत. त्यानंतर आजी विद्यार्थी, माजी विद्यार्थी , पालक तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याशी संवाद साधणार आहेत. त्यानंतर सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. महाविद्यालयाने राबविलेल्या विशेष उपक्रमांची माहिती सुद्धा ते घेणार आहेत. त्याचबरोबर दत्तक ग्राम योजनेअंतर्गत असलेल्या गावातील प्रतिष्ठित नागरिकांशी ते संवाद साधणार आहेत.दिनांक १२ जुलै रोजी दुपारच्या समारोप बैठकीनंतर ते महाविद्यालयाचा अहवाल प्राचार्यांना सादर करतील. यासाठी श्री सिद्धेश्वर महाविद्यालयातील आजी विद्यार्थी, माजी विद्यार्थी व पालक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाविद्यालयाच्या मूल्यांकनामध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहन महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष श्री. अभय कोकड, प्राचार्य प्रोफेसर सुहास मोराळे, नॅक समन्वयक डॉ. विनायक देशमुख व सर्व प्राध्यापकांनी केले आहे.

### मौजे जोला येथे ऊसतोड

ढाकणे, प्रयागाबाई ढाकणे, मिरा ढाकणे यांच्यासह गावकरी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना श्रीमती लटपटे यांनी महाएनजिओ फेडरेशन महाराष्ट्र राज्य व श्री तुळजाभवानी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था जोला च्या या उपक्रमाचे कौतुक केले पुढे बोलताना म्हणाल्या की सौ आशाताई ढाकणे यांनी प्रयत्न करुन ऊसतोड कामगारांच्या मुलामुलींना शालेय साहित्य मिळवून देण्याचे महत्त्वाचे काम केले आहे या मदतीमुळे विद्यार्थ्यांना ऊर्जा मिळेल असे उदगार लटपटे यांनी काढले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हनुमाननगर च्या मुख्याध्यापिका श्रीमती अर्चना श्रीराम माथेसुळ, सुरेखा खोगरे, आणेराव एस ए सर व श्री तुळजाभवानी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था जोला च्या सचिव सौ आशाताई ढाकणे यांनी उत्कृष्ट नियोजन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक महा एनजिओ फेडरेशन महाराष्ट्र राज्य चे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे यांनी केले.आभार अनंत सारुक मुख्याध्यापक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जोला यांनी मानले.

### अफाट गर्दीत.. उदंड उत्साहात

उभा राहून बजरंगबप्पा तुमचे प्रश्न देशाच्या संसदेत मांडतोय. हे केवळ तुमच्या आणि तुमच्याच प्रेमामुळे घडलं.

सर्व समाजाच्या मतांवर मी निवडून आलो. तुमचे हे पांग फेडल्याशिवाय राहणार नाही. माझ्या जिल्ह्याचा विकास माझ्यासाठी सर्वोपरी आहे. त्याबाबतीत कुठलीही तडजोड मी होऊ देणार नाही. आता आम्ही जिल्ह्याच्या विकासाचा विचार करू. सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवू. जनताच आपल्याला मोठं करत असते. जनतेने आपल्याला आजवर मोठे केले आहे. आता मला संधी दिली. त्या पटीचे कार्य मला करून दाखवावे लागेल. सर्व सरकारी विभागांच्यावर माझी बारीक नजर आहे. अर्ध्या रात्री काम पडले तरी बजरंग बप्पा तुमच्यासाठी उपलब्ध असेल, हा विश्वास देतो.'' अशा भावना यावेळी बोलताना व्यक्त केल्या.

## घोडका राजुरीजवळील पुलाचे काम गतीने पूर्णत्वास जाणार

### डॉ.योगेश क्षीरसागरांनी केली कामाची पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड ते परळी महामार्गावरील घोडका राजुरी परिसरात (ता.बीड) तलावाजवळ पुलाचे बांधकाम सुरू आहे. या रस्त्याच्या कामासह पुलाची पाहणी राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.९) केली. पावसात पर्यायी रस्ता वाहून जाऊ शकतो, त्यामुळे पुलाचे बांधकाम गतीने पूर्ण करावे, अशा सूचना त्यांनी संबंधित कंपनीला दिल्या. त्यानंतर पुलाचे बांधकाम प्राधान्याने पूर्ण करून देण्याची ग्वाही राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अभियंत्यांसह कंपनीच्या व्यवस्थापकांनी दिली आहे.



पहिल्याच पावसात पर्यायी पुल वाहून गेल्याचे प्रकार जिल्ह्यात काही ठिकाणी समोर आले आहेत. याच पार्श्वभूमीवर डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बीड तालुक्यातील घोडका राजुरी परिसरातील पुलाच्या बांधकामाची पाहणी केली. हे काम गतीने पूर्ण न झाल्यास तलावालगतच करण्यात आलेला पर्यायी रस्ता वाहून जाण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. असे झाल्यास वाहतूक विस्कळीत होऊन बीड व परळी भागाचा संपर्क तुटू शकतो, त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग विभागाने दक्षता घेण्याची गरज आहे, अशा सूचना डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केल्या. त्यानंतर राष्ट्रीय महामार्गचे बीड विभागाचे उपअभियंता राजेंद्र भोपळे, व्यवस्थापक विनोद करडमोल यांनी प्राधान्याने पुलाचे बांधकाम पूर्ण करून त्या भागातून वाहतूक व्यवस्था सुरळीत करून देण्याची ग्वाही दिली आहे. यावेळी नाळवंडीचे सरपंच ॲड.राजेंद्र राऊत यांच्यासह राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी, कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

## मुस्लिम धर्मगुरु मृतदेहाची हेळसांड करणाऱ्या राजकीय (दुत) व्यक्ती,तहसील प्रशासन, पोलिस अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करुन गुन्हे दाखल करा -शेख रशिद

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील दिंद्रुड येथील मुस्लिम धर्मगुरु शेख सुलेमान यांची निधन झाल्यानंतर त्यांच्या दफनविधी करण्यास मज्जाव करणार्या तहसील व पोलिस प्रशासन वरिल अधिकारी यांना तात्काळ निलंबित करुन तात्काळ गुन्हे दाखल करा तसेच राजकीय (दुत) व्यक्तीची चौकशी करुन कारवाई करा नसता लोकशाही मार्गाने एमआयएम पक्षातर्फे तिव्र आंदोलन करु असा इशारा एमआयएम शहराध्यक्ष शेख रशिद यांनी जिल्हाधिकारी यांना ईमेलद्वारे निवेदन देऊन मागणी केली आहे.



### माजलगाव एमआयएम पक्षाने दिला तिव्र आंदोलनाचा इशारा

कब्रस्तानच्या जागेचे गॅजेट असुन सातबारासह वक्फ बोर्डातही त्याची नोंद आहे. शेकडो वर्षांपासून त्या जागी कब्रस्तान असतांनाही तेथील तहसील आणि पोलीस प्रशासनाने मुस्लिम धर्मगुरू (आमीर साहाब) यांचा दफनविधी का रोखण्यात आला हयात राजकीय व्यक्तिंचा हात असुन हयाची तात्काळ चौकशी करण्यात यावे तसेच दिंद्रुड येथील बाजारतळा लगत असलेल्या कब्रस्तानच्या जागेचे प्रकरण हायकोर्टात सुरू आहे. शेकडो वर्षांपासून त्या जागेत कब्रस्तान असुन त्या जागेत शेकडो कबरी आहेत असे असतांना पोलीस प्रशासनाने तहसीलचे आदेश असल्याचे सांगून दफनविधी थांबण्यात आले हे प्रशासनावरची काळा दाग असुन एका विशिष्ट धर्मावर आघात करण्यात आली आहे हयात राजकीय (दुत) व्यक्ती असुन त्यांच्या बोलण्यावरून तहसील व पोलिस प्रशासनाने मुस्लिम धर्मगुरु यांचं मृतदेहाची हेळसांड केली असुन हयाची तात्काळ चौकशी करुन राजकीय (दुत) व्यक्ती, तहसील व पोलिस प्रशासनातील सर्व अधिकारी यांना निलंबित करुन तात्काळ गुन्हे दाखल करावे नसता लोकशाही मार्गाने एमआयएम पक्षातर्फे तिव्र आंदोलन करु असा इशारा एमआयएम शहराध्यक्ष शेख रशिद यांनी जिल्हाधिकारी यांना ईमेलद्वारे निवेदन देऊन मागणी केली आहे.

## अखेर स्वाराती रुग्णालयाला मिळणार नवीन सीटी स्कॅन मशीन

### आ. मुंदडांचे प्रयत्न यशस्वी; १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात नवीन सीटी स्कॅन मशीन करण्यासाठी राज्य शासनाने १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. मागील आठ महिन्यापासून रुग्णांची होणारी गैरसोय लक्षात घेत केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी आग्रही पाठपुरावा केल्यानंतर शासनाने मंगळवारी (दि.०९) निधी मंजुरीचे आदेश काढले.

अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात अत्यल्प दरात अद्यावत यंत्रसामुग्रीद्वारे तपासणी करून उपचार होत असल्याने येथे रुग्णांची दररोज प्रचंड गर्दी असते. परंतु येथील सिटी स्कॅन मशीन मागील आठ महिन्यापासून बंद पडली होती. आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्यानंतर अनेक अडचणींवर मात करत मागील महिन्यात हि मशीन तात्पुरत्या अवस्थेत पुन्हा सुरु करण्यात यश मिळाले होते. त्यामुळे अति अत्यावस्थ रुग्णांची गैरसोय काही प्रमाणात कमी झाली होती. मात्र कालबाह्य झालेली सध्याची मशीन कितपत चालेल याबाबत शंका असल्याने आ. नमिता मुंदडा यांनी नवीन वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांकडे नवीन सीटी स्कॅन मशीनसाठी युद्धपातळीवर पाठपुरावा सुरु केला होता. अखेर आ. मुंदडा यांचे प्रयत्न फलदायी ठरले असून राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने राज्य योजनेंतर्गत मंजूर अनुदानातून स्वाराती रुग्णालयात १२८ स्लाइस सीटी स्कॅन मशीन खरेदीसाठी १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. लवकरच निविदा प्रक्रिया पार पाडून नवीन मशीन येणार असल्याने रुग्णांना त्याचा प्रचंड लाभ होणार आहे. यानिमित्ताने सिटी स्कॅन मशीनसाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, लोकनेत्या पंकजाताई मुंडे, माजी खा. प्रीतमताई मुंडे यांचे आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

## केंद्रप्रमुख,सुखदेवराव तोंडे शिक्षण क्षेत्रातुन सेवानिवृत्त



**येवता । प्रतिनिधी**

आप्पाराव सारूक दि.६ रोजी गट साधन केंद्र,केज कार्यालयातील सुखदेव तुकाराम तोंडे वयानुरूपी सेवानिृवत्ती झाले त्यांच्या मनोगतात ते म्हणाले न की दोन गोष्टी विचारल्या जातात....एक म्हणजे तब्येत आणि दुसरं म्हणजे तुमची मुलं काय करतात. मी ह्या दोन्ही गोष्टी साध्य केल्या आहेत माझा मुलगा दंतरोगतज्ञ डॉ.भगवान सारखा कुटुंब वात्सल्य, संवेदनशील, कर्तुत्वान, स्वाभिमानी, सत्यवादी,सामाजिक भान आणि बांधिलकी ठासून भरलेला मुलगा घडवला तसेच आपली मुलं कशी सांभाळावी हेच नाहीतर कशी घडवली पाहिजे हे शिकवलं ....पेशा शिक्षक होता अनेक विद्यार्थी घडवले पण कुटुंब एका रेषेत बांधून ठेवले..... दोन मुलीचं शिक्षण करून अतिशय चांगल्या घरात एक पोलीस तर दुसरे डॉक्टर यांच्याशी विवाह करूण त्यांचे संसार आनंदात आहेत सुखदेव तुकाराम तोंडे सर केंद्रप्रमुख हे आज दि.३०/जून/२०२४ रोजी त्यांच्या शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार यांच्याकडे इंजि.एन.डी. शिंदे यांची केज विधानसभेच्या उमेदवारीची मागणी

अंबाजोगाई(प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यातील केज विधानसभा मतदारसंघात आपण निवडणूक लढविण्यास इच्छुक असून आपणास मा शरदचंद्र पवार यांनी केज विधानसभेसाठी उमेदवारी द्यावी अशी मागणी नुकतीच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार यांच्याकडे केली आहे. इंजि एन डी शिंदे (सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता )यांनी शरद पवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याकडे देखील आपल्या मागणीचे पत्र सादर केले आहे.

आगामी सप्टेंबर ऑक्टोबर महिन्यात राज्यात विधानसभा निवडणूक होऊ घातली आहे. त्यामुळे प्रत्येक पक्ष त्या तयारीला लागला आहे. पक्षाबरोबर आजी माजी तथा इच्छुक उमेदवार देखील निवडणूक लढविण्यासाठी मतदारांच्या व वरीष्ठ नेत्यांच्या गाठीभेटी घेतांना दिसून येत आहे. अशातच माजी कार्यकारी अभियंता एन डी शिंदे(नवनाथ ज्ञानोबा शिंदे)यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार यांच्याकडे केज विधानसभेच्या उमेदवारीची मागणी केली आहे. शिंदे हे अंबाजोगाई तालुक्यातील कुंबेफळ या गावचे रहिवासी असून ते उच्चविद्या विभूषित आहेत. त्यांनी ३६ वर्ष शासकीय सेव केली असून ते २०२०साली नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.



आपल्या ३६वर्षाच्या कार्यकाळात २६ वर्ष बीड जिल्ह्यातच सेवा बजावली असल्याने त्यांचा बीड जिल्ह्यात दांडगा संपर्क निर्माण झाला आहे. त्यांना समाजसेवेचा ध्यास असल्याने आपल्या सेवकाळात देखील त्यांनी सामाजिक सेवेचा वसा सोडला नाही .राज्याचे माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या माध्यमातून आपली समाजसेवा कार्यरत ठेवली होती. राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे मराठवाडा उपाध्याय म्हणून आजही ते काम पहात आहेत.त्याचबरोबर डॉ बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनियर्स या संघटनेचे लातूर जिल्हाध्यक्ष म्हणून देखील अतिशय उत्तम असे काम केले आहे.

राज्याच्या माजी मंत्री स्व विमालताई मुंदडा यांच्या निधनाने रिक्त झालेल्या पोटनिवडणुकीत देखील शिंदे यांच्या पत्नीचा उमेदवारी अर्ज दाखल केला होता.मात्र ऐनवेळी आपल्याकडून दुसऱ्याच उमेदवारास उमेदवारी जाहीर केल्याने मा.प्रकाशदादा सोळंके यांच्या सूचनेवरून आपणास उमेदवारी अर्ज मागे घ्यावा लागला होता. मात्र आजच्या राजकीय परिस्थितीत आपणास केज विधानसभेसाठी उमेदवारी द्यावी अशी मागणी इंजि एन डी शिंदे यांनी शरदचंद्र पवार यांच्याकडे केली आहे. उमेदवारी मागणीचे पत्र प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याकडे सादर करून खासदार बजरंग सोनवणे यांचयाकडे देखील आपल्या उमेदवारीसाठी शिफारस करावी अशी मागणी इंजि एन डी शिंदे यांनी केली आहे.आपणास पक्षाने उमेदवारी दिल्यास आपण पूर्ण ताकदीने निवडणूक लढून जिंकून येण्यासाठी जीवाचे रान करू असेही त्यांनी आपल्या मागणीत उल्लेखित केले आहे. ते सध्या विविध पक्षांच्या कार्यर्त्याच्या , मतदारांच्या भेटीगाठी घेऊन आपला संपर्क अभियान राबवित आहेत यामध्ये त्यांना जागोजागी चांगला प्रतिसाद मिळत आहे.

# अवघ्या काही तासांच्या पावसाचा सर्वत्र हाहाकार!

## हजारो शेतकऱ्यांना अतिवृष्टीचा फटका, बळीराजा पुन्हा हवालदिल

गेल्या कित्येक दिवसांपासून दांडी मारून बसलेल्या वरुणराजाने अखेर विदर्भातील काही जिल्ह्यांना अक्षरक्ष: झोडपून काढले आहे. नागपूर प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवविलेले अंदाजानुसार आज देखील विदर्भात मुसळधार पावसाचा अंदाज आहे. तर रविवारच्या रात्री पासून सुरू असलेल्या दमदार पावसामुळे सर्वत्र जनजीवन विस्कळीत झाल्याचे बघायला मिळाले. अशातच या पावसाचा सर्वाधिक फटका अकोला, बुलढाणा, वाशिमसह इतर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बसला आहे. विदर्भातील अनेक जिल्ह्यातील शेतकर्यांच्या शेतात मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी साचल्याने शेतीला तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले असून शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. एकट्या बुलढाणा जिल्ह्यातील १७ महसूल मंडळात अतिवृष्टी झाल्याने जवळपास ११ हजार हेक्टरवरील पिकाचे नुकसान झालं आहे. तर पंधरा हजार शेतकऱ्यांना या अतिवृष्टीचा फटका बसला आहे. एकीकडे पश्चिम विदर्भाला पावसाने झोडपून काढले असताना पूर्व विदर्भ मात्र अद्याप दमदार पावसाच्या प्रतीक्षेतच असल्याचे चित्र आहे. त्यामुळे बळीराजा चिंतेत सापडाला आहे.

हजारो शेतकर्यांना अतिवृष्टीचा फटका, बळीराजा पुन्हा हवालदिल :

बुलढाणा जिल्ह्यात काल, सोमवारी दिवसभर झालेल्या पावसाने कहरच केला आहे. यंदाच्या पावसाळ्यात जिल्ह्यातील १७ महसूल मंडळात अतिवृष्टी झाल्याने जवळपास ११ हजार हेक्टर



वरील पिकाचे नुकसान झालं आहे. तर पंधरा हजार शेतकऱ्यांना या अतिवृष्टीचा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांचं शेती साहित्य सुद्धा वाहून गेला आहे. त्यामुळे आता शेतकरी हवालदिल झाला आहे. जिल्ह्यातील मोताळा, खामगाव, नांदुरा आणि शेगाव या चार तालुक्यात काल दिवसभर पाऊस कोसळला. सर्वात जास्त पाऊस खामगाव तालुक्यातील आवार या महसूल मंडळात २१९.३ मिलिमीटर पाऊस कोसळला. त्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती असून शेतकरी पुन्हा आर्थिक अडचणीत सापडला आहे.

पावसाचा पोलीस भरती प्रक्रियेवरही परिणाम, विद्यार्थ्यांची तारांबळ

अमरावती ग्रामीण पोलिसांची भरती प्रक्रियेतील मैदानी चाचणी अमरावतीच्या जोग मैदानावर सुरू आहे. मैदानी चाचणी देण्यासाठी महिला उमेदवार सकाळी ४ वाजता पासून दाखल झाल्या आहेत. मात्र, गेल्या दोन दिवसापासून अमरावतीत मुसळधार पाऊस सुरू असल्याने मैदान अक्षरक्ष: चिखलमय झाले आहे. मैदानावर चिखल असल्याने मुलींना धावण्यात अडथळा निर्माण होतो. मात्र मैदानात चिखल असल्याने मैदानी चाचणी देतांना मोठ्या दुर्घटनेलाही समोर जावे लागू शकते. त्यामुळे मैदानी चाचणी पुढे ढकलावी, अशी मागणी काही मुलींनी केली आहे. तर काही मुली आतमध्ये मैदानी चाचणी साठी गेल्या आहेत.

विदर्भात मुसळधार पावसाची दाणादाण

एकट्या अकोल्यात गेल्या २४ तासांपासून सुरू असलेल्या संततधार पावसानं जनजीवन पार विस्कळीत केलंय. अकोल्यातील अनेक सखल भागांत पाणी साचलंय. अकोला शहरातील मुख्य रस्त्यांपैकी एक असलेल्या दुर्गाचौक ते जठारपेठ रस्त्याला अक्षरश: नदीचं स्वरूप आलंय. या रस्त्यावरून वाहनं चालवतांना नागरिकांना मोठी कसरत करावी लागतीये. महापालिकेनं केलेलं नालेसफाईचा दावा या रस्त्यावर साचलेल्या पाण्याने धुवून काढलाय. या पावसामुळे सर्वत्र एकच दाणादाण उडवली असल्याचे चित्र आहे.

## विमा प्रतिनिधींचे मोबाईल क्रमांक आता ग्रामपंचायतीत लावणार




पुणे : नैसर्गिक आपत्तीकाळात भरपाईच्या वेळी विमा कंपनीकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. त्या वेळी कोणाशी संपर्क साधावा, याविषयी माहिती नसल्याने शेतकरी हतबल होतात. त्यावर उपाय म्हणून (कै.) वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन अंतर्गत असलेल्या गावांमधील ग्रामपंचायत कार्यालयाच्या बाहेर विमा प्रतिनिधींचे मोबाइल क्रमांक उपलब्ध करून देण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे.

गेल्या वर्षीपासून राज्यात एक रुपयात पीकविमा योजना राबविण्यात येत आहे. योजनेत लाभार्थ्यांची संख्या वाढती असली, तरी भरपाईच्या वेळी मात्र विमा कंपनीकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. कायद्यातील तरतुदींचा फायदा घेत शेतकऱ्यांना भरपाईपासून वंचित ठेवले जाते, असा अनुभव आहे. हतबल शेतकरी कृषी अधिकाऱ्यांकडे वारंवार जात त्यांच्या कार्यालयाचे उंबरठे झिजवीत भरपाईची अपेक्षा करतात. मात्र हा प्रश्न जिल्हाधिकाऱ्यांच्या अखत्यारीतील असल्याने त्यांच्या समस्येचे समाधान करणे कृषी अधिकाऱ्यांना शक्य होत नाही. यातूनच शेतकऱ्यांमध्ये नैराश्य वाढीस लागते. विमा प्रतिनिधींचे संपर्क क्रमांकही उपलब्ध नसतात. संपर्क क्रमांक उपलब्ध असले तर अनेकदा स्वीच ऑफ येतात, असाही शेतकऱ्यांचा अनुभव आहे. या सर्वांवर उपाय म्हणून आता थेट विमा कंपनी प्रतिनिधींचे मोबाइल क्रमांकच ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध करण्याची अनोखी मोहीम (कै.) वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनमधून हाती घेण्यात आली आहे.

मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे हे त्यासाठी आग्रही असून, तशा सूचना मिशनअंतर्गत असलेल्या आत्महत्याग्रस्त सहा जिल्ह्यांतील जिल्हाधिकारी, प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. पहिल्या टप्प्यात अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यात या अभिनव उपक्रमाची अंमलबजावणी केली जात आहे.

## कांदा तन नियंत्रण करण्याची संपूर्ण माहिती

महाराष्ट्रात प्रामुख्याने नाशिक, पुणे आणि नगर या जिल्हयामध्ये कांदा उत्पादन जास्त क्षेत्रावरती केले जाते. कांदा पिकामधील कीड-रोगाप्रमाणेच तन हा देखील एक महत्वाचा आणि ज्वलंत प्रश्न आहे. जर कांदा पिकात तन नियंत्रण वेळेवर केले नाही तर कांद्याचे ६५ ते ६८ टक्के नुकसान होऊ शकते.

कांदा पिकामध्ये येणारी प्रमुख तणे : कांदा पिकामध्ये प्रामुख्याने बहुवर्षीय लव्हाळा, हरळी, वर्षीय माठ, लहान दुधी, समघास, गोखरू, काँग्रेस गवत, वाघनखी इ. या तणाचे एकत्रित नियंत्रण करणे खूप गरजेचे आहे.

कांदा तन नियंत्रण पद्धती : कांद्याची लागवड करावयाच्या क्षेत्रात २० ते २५ सेंमी आडवी आणि उभी खोल नांगरट करावी नंतर २ ते तीन कुळवाच्या पाळ्या घालून जमीन भुसभुशीत करावी व हरळी ,लव्हाळा या तणांच्या मुळासकट गाठी व काश्या गोळा करून जाळून नायनाट करावा. पहिली खुरपणी पहिल्या एक महिन्याच्या आता करावी. दुसरी खुरपणी त्यानंतर एक महिण्याने करावी. खुरपणी करत असताना एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवा कांद्याच्या मुळ्या जमिनीत वरच्या थरात असल्या मुळे मशागत खोलवर करू नये आणि मुळांना इजा टाळावी.

कांद्याच्या आकाराचे मल्चिंग पेपर बाजार मध्ये उपलब्ध आहेत त्याचा वापर करून तणाचे नियंत्रण करता येते. काळी बाजू खाली आणि पांढरी बाजू वरती करून पॉलिथिन पसरावे.

कांदा पिकासाठी तन नाशके : कांदा लागवडी नंतर २० ते २५ दिवसांनी ऑक्सिफ्लुओरफेन २३.५% इ.सी १५ मिली + क्विझालोफॉप इथाइल ५% ईसी २५ ते ३० मिली प्रती १५ लीटर पाण्यात मिसळून फवारणी घ्यावी. किंवा क्विझालोफॉप इथाइल ४% + ऑक्सिफ्लुओर्फेन ६% ईसी ३० मिलि प्रती १५ लीटर पाण्यात मिसळून फवारणी घ्यावी. या पैकी कोणतीही एक फवारणी घ्यावी. व नंतर गरज भासल्यास हलकीशी खुरपणी करावी.

फवारणी करतानाच्या सूचना :

१. तणनाशक फवारतानी अगोदर कृषी तज्ञाचा सल्ला नक्की घ्यावा.

२. फवारणी करताना जमिनीत हलका ओलावा असावा.

३. तणनाशकामध्ये कीटकनाशक किंवा बुरशीनाशक मिसळू नये.



# सेनगावात पिकविम्यासाठी शेतकरी आक्रमक, कृषी अधीक्षक कार्यालयात ठिय्या

राज्यात एक रुपयात पिकविमा योजनेचा बोजवारा उडाल्याचे चित्र दिसत असून राज्यातील शेतकऱ्यांचे पिकविम्याचे अर्ज फेटाळण्यात आल्याने शेतकरी आक्रमक झाले आहेत. गेल्या वर्षी खरीप आणि रब्बी हंगामात शेतकऱ्यांनी पीक विमा मोठ्या प्रमाणात भरला खरा पण पावसाचा खंड आणि नंतर झालेल्या अतिवृष्टीमुळे क्लेम करूनही पिकविमा मिळत नसल्याने हिंगोलीच्या सेनगाव तालुक्यात शेतकरी आक्रमक झाले आहेत.

शेतकऱ्यांचे कृषी अधीक्षक कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन

शेतकऱ्यांनी कृषी अधीक्षक कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरु केले असून जोपर्यंत पिक विमा मिळत नाही तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा पवित्रा घेतला आहे. पिकविम्याच्या मागणीसाठी सोमवारीही तालुक्यात एक आंदोलन झाले. यावेळी कार्यालयांची तोडफोड करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

विमा कंपनीच्या कार्यालयात तोडफोड

हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पिक विमा मिळत नसल्याने संतापलेल्या शेतकऱ्यांनी सोमवारी हिंगोली शहरातील पिकविमा कंपनीचं कार्यालय फोडलं आहे. गेल्या वर्षी पावसाचा पडलेला खंड



आणि अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं होतं. दरम्यान, या काळात अनेक शेतकऱ्यांनी नुकसान तक्रारीही दिल्या त्यानंतर शेतकऱ्यांना विमा मंजूरही झाला, परंतु तो विमा परतावा शेतकऱ्यांना मिळत नसल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी हिंगोली शहरातील हनुमाननगर भागात असलेल्या पिक विमा कंपनीच्या कार्यालयात तोडफोड केली आहे .

पिकविमा योजनेत शेतकऱ्यांच्या आशा पाण्यात

हिंगोली जिल्ह्यांमध्ये गेल्या वर्षी खरीप आणि रब्बी हंगामात शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात पीक विमा भरला. राज्य शासनाने एक रुपयात पिकविमा ही योजना सुरू केल्यानंतर शेतकऱ्यांनी हा विमा मोठ्या प्रमाणात भरला होता. परंतु, मागील वर्षी आधी पावसाचा खंड पडला आणि नंतर अतिवृष्टीने पावसाचे मोठे नुकसान झाले. परिणामी शेतकऱ्याला सरकारकच्या या योजनेतून तरी काही पैसे मिळतील अशी आशा होती. पण, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या या आशा पाण्यात गेल्याचे पहायला मिळत आहे.

पिकविमा कंपनीच्या कारभारावर ठेवले बोट

राज्यभरात सध्या सरकारसह पिकविमा कंपनीच्या कारभारावर बोट ठेवले जात असून छत्रपती संभाजीनगरसह अकोला, हिंगोली जिल्ह्यात पिकविम्यापासून शेतकऱ्यांना वंचित ठेवले जात असल्याची तक्रार शेतकऱ्यांकडून होत आहे. आक्रमक शेतकरी जिल्ह्यातील कृषी अधीक्षकांच्या कार्यालयाकडे धाव घेत असून गोंधळाचे वातावरण आहे. छत्रपती संभाजीनगरमधील ७० टक्के नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे दावे फेटाळले

छत्रपती संभाजीनगरमध्ये नोव्हेंबर २०२३ मध्ये झालेल्या अतीवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीत विमा कंपनीने ७० टक्के शेतकऱ्यांचे () दावे फेटाळले आहेत. संभाजीनगर जिल्ह्यात ऑक्टोबर नोव्हेंबरमध्ये अतिवृष्टी झाली होती. या नुकसानीत ६८०५४८ शेतकऱ्यांनी विमा कंपन्यांना पूर्व सूचना दिल्या होत्या. त्यापैकी विमा कंपन्यांनी २२९१५५ दावे स्वीकारले तर ४५१३९३ दावे फेटाळले आहेत. यामुळं शेतकरी आक्रमक झाले आहेत.

कृषी अधिकार्यांसह विमा कंपनीच्या प्रतिनिधींना शेतकऱ्यांनी कार्यालयात डांबलं

अकोला जिल्ह्यातील अकोट तालूक्यात जवळपास पावणेदोनशे शेतकरी केळीच्या पीकविम्यापासून वंचित आहेत. वेळोवेळी याबाबत तक्रार करूनही संबंधित प्रशासनाने अद्याप कुठलीही उपाययोजना अथवा ठोस आश्वासन दिलेले नाही. त्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी आज थेट कृषि अधिकारी, विमा कंपनी अधिकार्यांसह स्वत:ला डांबून घेतलं होतं. विम्याचे जवळपास ४.७५ कोटी रुपये थकीत असल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे ठोस निर्णय घेतल्याशिवाय कृषी अधिकारी आणि विमा प्रतिनिधींना कार्यालयातच डांबून ठेवणार असल्याचा आक्रमक पवित्रा शेतकऱ्यांनी घेतला होता.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८०० : फोर्ट विल्यम कॉलेज ची स्थापना.
१८९० : वायोमिंग अमेरिकेचे ४४ वे राज्य बनले.
कॅलिफोर्नियातील डेथ व्हॅलीमध्ये तापमान १३४ अंश फूट (५७ अंश सेल्सिअस) पर्यंत वाढले, जे पृथ्वीवरील सर्वात उच्च तापमानाचे रेकॉर्ड आहे.
१९२३ : मुसोलिनीने इटलीतील सर्व राजकीय पक्षांवर बंदी घातली.
१९२५ : 'तास' या सोवियेत संघाच्या वृत्तसंस्थेची स्थापना
१९२५ : अवतार मेहेरबाबा यांनी आपल्या मौनव्रताची सुरूवात केली. हे व्रत त्यांनी सलग ४४ वर्षे त्यांच्या मृत्यूपर्यंत पाळले.
१९२५ : तास या सोवियेत संघाच्या वृत्तसंस्थेची स्थापना झाली.
१९४० : 'बॅटल्? ऑफ ब्रिटन' या नावाने ओळखले जाणारे हवाईयुध्द सुरू. नाझी जर्मन विमानदलाने इंग्लंडवर प्रचंड मोठया संख्येने विमाने पाठवून बॉबफेक सुरू केली. इंग्लिश हवाईदलाने जर्मनांचा यशस्वी प्रतिकार केला.
१९४७ : ब्रिटिश पंतप्रधान क्लेमंट ॲटली यांच्या शिफारशीवरून मुहम्मद अली जिना पाकिस्तानचे पहिले गव्हर्नर जनरल झाले.
१९६२ : 'टेलस्टार-१' हा पहिला अमेरिकन दळणवळण उपग्रह यशस्वीपणे अंतराळात प्रक्षेपित
१९७३ : पाकिस्तानच्या संसदेने बांगलादेशला मान्यता दिली.
१९७३ : बहामाजला (युनायटेड किंग्डमपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९७८ : मॉरिटानियात लष्करी उठाव झाला.
१९७८: मुंबई येथे महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ स्थापन करण्यात आले.
१९८३ : ब्रिटन मध्ये मार्गरेट थेचर यांची पंतप्रधान पदी पुन्हा नियुक्ती झाली.
१९९२ : मादक द्रव्यांच्या तस्करीबद्दल पनामाचे माजी राष्ट्राध्यक्ष मॅन्युएल नोरिएगा यांना फ्लोरिडात ४० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली. नंतर ही शिक्षा कमी करुन ३० वर्षांची करण्यात आली.
१९९२ : संपूर्ण स्वदेशी बनावटीच्या 'इन्सॅट २ ए' या उपग्रहाचे फ्रेंच गयानातील कोउरू येथून प्रक्षेपण
१९९२ : आर्वी येथील 'विक्रम इनसॅट भू-केंद्र' राष्ट्राला अर्पण
१९९५ : म्यानमारमधील लोकशाही चळवळीच्या प्रणेत्या आंग सान सू क्यी यांची ६ वर्षांच्या नजरकैदेतून बिनशर्त मुक्तता
१९९९ : जिनिव्हा या ठिकाणी आंतरराष्ट्रीय श्रम संमेलनाची सुरुवात करण्यात आली.
२००० : नायजेरियात एका फुटलेल्या तेलवाहिनीत स्फोट होऊन गळणारे तेल गोळा करण्यासाठी आलेले २५० जण जळुन ठार झाले.
२००० : विज्ञानप्रसारासाठीच्या कार्याबद्दल नेहरू तारांगणातर्फे दिला जाणारा 'मनुभाई मेहता पुरस्कार' शास्त्रज्ञ वि. ग. भिडे यांना जाहीर
२००३ : अमेरिकेच्या नासा या अंतराळ संस्थेने मंगळावर पाठवलेले मंगळ यान रोवर मंगळ ग्रहावर यशस्वी उतरले.
२००५ : भारत आणि श्रीलंका देशादरम्यान शिक्षण आणि समुदाय विकासाशी संबंधित दोन करारांवर हस्ताक्षर करण्यात आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : वाय फाय प्रणालीचे जनक व अमेरिकन सर्बियन-अमेरिकन शोधक, इलेक्ट्रिकल अभियंता, मेकॅनिकल अभियंता निकोला टेस्ला यांचा जन्मदिन.
१८८८ : प्रसिद्ध भारतीय क्रांतिकारक व शिक्षणमंत्री महात्मा हंसराज यांचे पुत्र बलराज भल्ला यांचा जन्मदिन.
१९०३ : रा. भि. जोशी साहित्यिक (मृत्यू:)
१९१३ : पद्मा गोळे कवयित्री (मृत्यू: १२ फेब्रुवारी १९९८)
१९१४ : सुपरमॅन हिरो चे सहनिर्माते जो शस्टर यांचा जन्म. (मृत्यू: ३० जुलै १९९२)
१९२१ : स्माईली चे निर्माते हार्वे बॉल यांचा जन्म. (मृत्यू: १२ एप्रिल २००१)
१९२३ : गुरूनाथ आबाजी तथा जी. ए. कुलकर्णी साहित्य अकादमी पुरस्कार विजेते गूढकथालेखक (मृत्यू: ११ डिसेंबर १९८७)
१९३४ : पद्मभूषण विजेते जामखेड मॉडेल चे जनक डॉ. रजनीकांत आरोळे यांचा सुपे अहमदनगर येथे जन्म.
१९४० : लॉर्ड मेघनाद देसाई अर्थशास्त्रज्ञ आणि इंग्लंडच्या 'हाऊस ऑफ लॉर्डस'चे सभासद
१९४३ : आर्थर ॲश अमेरिकन टेनिस खेळाडू (मृत्यू: ६ फेब्रुवारी १९९३)
१९४५ : व्हर्जिनिया वेड इंग्लिश टेनिस खेळाडू
१९४९ : सुनील मनोहर तथा 'सनी' गावसकर क्रिकेटपटू व समालोचक
१९५० : 'बेगम' परवीन सुलताना पतियाळा घराण्याच्या शास्त्रीय गायिका
१९५१ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी व उत्तरप्रदेश राज्याचे मुख्यमंत्री राजनाथ सिंह यांचा जन्मदिन.
१९८१ : राजीव गांधी खेल रत्न, अर्जुन पुरस्कार, व पद्मश्री पुरस्कार सास्न्मानीत पॅराॲथलेटिक्स पटू देवेंद्र झाझड़िया यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५५९ : हेन्री (दुसरा) फ्रान्सचा राजा (जन्म: ३१ मार्च १५१९)
१९६९ : डॉ. पांडुरंग सखाराम पिसुर्लेकर इतिहासकार (जन्म: ३० मे १८९४)
१९७० : आईसलॅंडचे पंतप्रधान ब्यार्नी बेनेडिक्ट्सन यांचे निधन.
१९७१ : भिखारी ठाकूर भोजपुरी भाषेचे 'शेक्सपिअर' (जन्म: १८ डिसेंबर १८८७)
१९८९ : प्रभाकर ऊर्ध्वरेषे साम्यवादी विचारवंत व साहित्यिक (जन्म:)
१९९५ : डॉ. रामकृष्ण विष्णू तथा 'दादासाहेब' केळकर 'गरिबांचे डॉक्टर' म्हणून प्रसिद्ध, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या अभिनव भारत मंदिराचे अध्यक्ष (जन्म:)
२००० : भारतीय पत्रकार आणि राजकारणी वक्कम मजीद यांचे निधन. (जन्म: २० डिसेंबर १९०९)
२००५ : जयवंत कुलकर्णी (जन्म: ३१ ऑगस्ट १९३१)
२०१३ : भारतीय लेखक आणि शैक्षणिक गोकुलानंद महापात्रा यांचे निधन. (जन्म: २१ मे १९२२)
२०१४ : भारतीय अभिनेत्री, नृत्यांगना आणि नृत्यदिग्दर्शक जोहरा सेहगल यांचे निधन. (जन्म: २७ एप्रिल १९१२)

# वनविभाग फुकेवाडी करांच्या मुळावर ; रस्ता डांबरीकरणाला वनविभागाचा अडसर

## ८ पैकी ६ किलोमीटर डांबरीकरण पुर्ण, वनविभागाने २ किलोमीटर रस्ता अडवला






लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पिंपरनई ग्रामपंचायत अंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत असलेल्या फुकेवाडी येथील ग्रामस्थांना डोंगराळ भागातुन रस्त्याची अडचण असल्याने ग्रामस्थांनी वारंवार जिल्हा दरबारी हेलपाटे घालुन लोकप्रतिनिधींच्या पाया पडून डांबरीकरण रस्त्याला परवानगी मिळवली.मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत तब्बल पावणे दोन कोटी रुपये खर्चून रस्ता तयार झालेला असतानाच असतानाच वनविभागातील आधिका-यांच्या आडमुठ्या भूमिकेमुळे रस्ता प्रलंबित राहीला असुन वनविभागाने रस्ता अडवल्याने कंत्राटदार अर्धवट काम करून सोडुन दिला आहे.यामध्ये फुकेवाडी करांचे हाल होत असुन नदीवरील पुल तसेच दोन्ही बाजुंनी डांबरीकरण झालेले असताना वनविभागाच्या हद्दीतील रस्ता काम रखडलेलेच आहे. संबंधित प्रकरणात सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी फुकेवाडी ग्रामस्थांसोबत शासन दरबारी निवेदन तसेच आंदोलनाद्वारे रस्त्याचा प्रश्न मार्गी लावावा अशी विनंती लेखी निवेदनाद्वारे केली आहे. बीड तालुक्यातील पिंपरनई ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत फुकेवाडी हे बालाघाटाच्या डोंगर द-यात वसलेले गाव ३५ -४० घरं असणा-या बहुतांश ग्रामस्थ ऊसतोड मजूर, डोंगरद-यातील सिताफळ,लिंबु आदि रानमेवा विकुन पोट भरणारी.यांना बाजारहाट , दवाखाना,शाळा आदिंसाठी अडीच किलोमीटर डोंगर चढून ८ किलोमीटर अंतरावर लिंबागणेश याठिकाणी जावं लागतं.देशाला स्वातंत्र्य मिळुन ७५ वर्षे होऊन सुद्धा शासनाची बस न पाहिलेलं बीड शहरापासून २० किलोमीटर अंतरावर असलेले गाव.१९७४ पासुन याठिकाणी ४ थी पर्यंत जिल्हा परीषद शाळा आहे.

### वनविभागाने रस्ता रोखल्याने ग्रामस्थ हवालदिल

बापजाद्यापासुन याठिकाणी वास्तव्य करणाऱ्या ग्रामस्थांना २००९ साली शासकीय निधीतून कच्चा रस्ता करण्यात आला होता.मात्र मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत इजिमा ११५ ते फुकेवाडी रस्ता सुधारणासाठी या अडीच किलोमीटर डोंगराळ भागातील रस्त्यांसाठी १ कोटी ६८लाख रुपये निधी मंजूर होऊन डी.बी.कनस्ट्रक्शन मार्फत रस्ता करण्यात आलेला आहे.मात्र वनविभागाच्या जागेतुन हा रस्ता जात असल्याने वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी रस्ता अडवला आहे त्यामुळे कंत्राटदार यांनी रस्त्याचे काम अर्धवट करून सोडुन दिले आहे.त्यामुळे रस्ता पुर्ण होणार की नाही यामुळे ग्रामस्थ चिंताग्रस्त आहेत.

### वनविभागाकडून सहकार्य अपेक्षित

फुकेवाडी गाव ७५ वर्षांपासून त्याठिकाणी वसलेले असुन ग्रामस्थांना याच रस्त्याने दवाखाना ,शाळा, बाजारहाट यासाठी लिंबागणेश याठिकाणी जावे लागते. गेल्या १५ वर्षात वनविभागाच्या ताब्यात डोंगराळ भाग आलेला आहे.तसेच यापूर्वीही शासनाच्या निधीतून याठिकाणी कच्चा रस्ता झालेला आहे. त्यामुळे शासनाचे पावणे दोन कोटी रुपये खर्चून होणा-या रस्तेकाम अडवण्याची वनविभागाची भुमिका आडमुठेपणाची अन्यायकारक असुन वनविभागातील अधिकारी यांनी ग्रामस्थांची २ किलोमीटर डोंगर चढून जाण्याची अडचण लक्षात घेऊन सहकार्य करणं अपेक्षित आहे.

---

## परीक्षेच्या अनुषंगाने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) मनाई आदेश लागू

बीड । प्रतिनिधी

तुळजा भवानी मंदिर संस्थान, तुळजापूर जिल्हा धाराशिव येथे सरळ सेवेने वर्ग ३ व वर्ग ४ मधील विविध पदे भरण्यासाठी आयबीचीएफ कंपनीमार्फत ऑनलाईन पध्दतीने खालील प्रमाणे नमूद केलेल्या परिक्षा केंद्रावर दि. १३ जुलै २०२४ व दि. १४ जुलै २०२४ रोजी तीन सत्रात परीक्षा होणार आहेत. परीक्षे दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परीक्षा केंद्राच्या परिसरात कलम १४४ लागू करण्यात आले आहे. प्रोफेशनल करिअर ओरिएंटेशन सेंटर अंबाजोगाई, योगेश्वरी महाविद्यालय कॅम्पस, परळी रोड, अंबाजोगाई, परीक्षा केंद्राजवळच्या १०० मीटरच्या परीसरातील सर्व सार्वजनिक टेलिफोन, एसटीडी बुथ, झेरॉक्स केंद्र व ध्वनीक्षेपके परिक्षेच्या कालावधीत बुथ ठेवणे आवश्यक असल्याने परीक्षा कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात फौजदारी दंड संहिता १९७३ चे कलम १४४ लागू करण्यात आले आहे.

परीक्षा केंद्राच्या १०० मिटर परिसरात दि. १३ व १४ जुलै २०२४ रोजी त्या त्या दिवशीच्या परिक्षेच्या वेळीच्या कालावधीत आणि परिक्षा साहित्य ठेवलेल्या ठिकाणी फौजदारी संहिता १९७३ चे कलम १४४ (२) प्रमाणे परीक्षा केंद्र व परिसरात खालीलप्रमाणे कृत्य करण्यास मनाई आदेश जारी केले आहे. हे आदेश परीक्षेच्या कामाकाजासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांना लागू राहणार नाही. परीक्षा केंद्राबाहेर व परिसरात परिक्षेसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी व परिक्षार्थी यांना वगळून दोन किंवा दोनपेक्षा जास्त व्यक्तीस एकत्र येण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. परीक्षा केंद्राजवळच्या १०० मीटरच्या परीसरातील सर्व सार्वजनिक टेलीफोन,एसटीडी बुथ फॅक्स, झेराक्स केंद्र व ध्वनीक्षेपके परिक्षेच्या कालावधीत चालू ठेवण्यासाठी प्रतिबंध करण्यात आला आहे. शासकीय व परिक्षेसंबधीत कर्मचा-यांच्या व विद्यार्थ्यांच्या वाहना व्यतिरिक्त इतर अनाधिकृत वाहनांना परिक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात येण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. हे आदेश कोणत्याही धार्मिक कार्यक्रम, मयाताची अंत्ययात्रासाठी लागू राहणार नाहीत. हे आदेश वरील परीक्षा केंद्रावर दि. १३ व १४ जुलै २०२४ या कालावधीत त्या त्या दिवशीच्या परिक्षेच्या वेळेच्या एक तास अगोदर ते परिक्षा पेपर संपेपर्यंतच्या कालावधीसाठी तसेच साहित्य ठेवलेल्या ठिकाणी व परीक्षा केंद्राच्या आवारात लागू राहतील. असे अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे.

---

## महिला सक्षमीकरणावर भर देण्याची गरज

### जयेश पटेल यांचे प्रतिपादन; रोटरी क्लबचा पदग्रहण सोहळा थाटात

बीड । प्रतिनिधी

सध्या विविध क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. परंतु ग्रामीण भागातील महिलांपर्यंत अद्याप पाहिजे तेवढ्या सुविधा, उद्योग – व्यवसायाशी निगडीत माहिती मिळत नाही. यासाठी आपण पुढाकार घेणे गरजेचे आहे. रोटरीचे काम जागतिक स्तरावर असून या माध्यमातून आता ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणावर भर द्यायला हवा असे प्रतिपादन डीजीएन जयेश पटेल यांनी केले.




बीड येथे रोटरी क्लब ऑफ बीडच्या पदग्रहण सोहळ्यात जयेश पटेल बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रो.हरिष मोटवाणी, रो.डॉ.शंकर जुजगर, माजी आ.प्रा.सुनील धांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. रोटरी क्लब ऑफ बीडचे नुतन अध्यक्ष रो.मेघराज पिंगळे व सचिव रो.संदिप खोड यांनी यावेळी कृष्णा खांडे व संकेत कदम यांच्याकडून पदभार स्विकारला. कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलनाने झाली. यावेळी जयेश पटेल यांनी रोटरीच्या कार्याचा आढावा सादर करत यापुढील काळात राबवायच्या उपक्रमांबाबत मार्गदर्शन केले. रो.हरिष मोटवाणी यांनीही रोटरीच्या बीड जिल्ह्यातील कार्याबाबत कौतूक करत जास्तीत जास्त संख्येने महिलांचा देखील यामध्ये सहभाग वाढायला हवा असे प्रतिपादन केले. यावेळी अध्यक्ष मेघराज पिंगळे यांनी आगामी वर्षभरात महिला सक्षमीकरण, आरोग्य, शिक्षण, कृषी विषयक उपक्रम राबवण्याचा मनोदय व्यक्त केला. कार्यक्रमास वाय.जनार्दन राव, राजेंद्र मुनोत, अभय कोटेचा, सुरज लाहोटी, अक्षय शेटे, संतोष पवार, गणेश मुळे, सुरेश लड्डा, अमर डागा, गणेश साळुंके, सुमित जैस्वाल,परमेश्वर जाधव, गोपाल लड्डा, कल्याण कुलकर्णी, विकास उमापुरकर, प्रमोद निनाळ, कृष्णा खांडे, अमर डागा, गणेश साळुंके, सुमित जैस्वाल, संकेत कदम, परमेश्वर जाधव, विवेक बडगे, डॉ.सचिन वारे, सुहास बेदरे, कमलेश मुंदडा, प्रमोद करमाळकर, डॉ.अमोल जोगदंड, अशोक काकडे, संतोष जाधव, महादेव जायभाय, डॉ.वरुण मिसाळ, डॉ.सुनील बोबडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी माजी आ.प्रा.सुनील धांडे व पत्रकार उदय नागरगोजे यांना मानद सदस्य म्हणून रोटरी पीन प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन रो.प्रा.सुनिल जोशी, सौ.उर्मिला कुलकर्णी यांनी केले तर आभार नुतन सचिव रो.संदिप खोड यांनी मानले.

#### शिवदरा परिसरात वृक्षारोपण

रोटरी क्लब ऑफ बीडच्या अध्यक्षपदाची सुत्रे हाती घेताच रो.मेघराज पिंगळे व रो.संदिप खोड यांनी शिवदरा येथे वृक्षारोपणाचा उपक्रम राबवला. यावेळी क्लबच्या सदस्यांसह शिवदरा परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

---

## बीड-मुंबई पायी निघालेल्या शेख वसीम यांची भेट घेऊन आरक्षण समितीने जाहिर केला पाठिंबा

बीड । प्रतिनिधी

मुस्लिम आरक्षणाच्या मागणीसाठी बीड ते मुंबई मंत्रालय मागणीचे निवेदन देण्यासाठी दिनांक ४ जुलै पासून पायी प्रवासावर निघालेले येथील रहिवासी समाजसेवक शेख वसीम यांची आरक्षण समितीने औरंगाबाद वालुज येथे भेट घेऊन त्यांना जाहीर पाठिंबा दिला आहे.



राज्यात कित्येक वर्षापासून अनेक पक्ष संघटना नेत्यांच्या वतीने मुस्लिम आरक्षण आंदोलन केले जात आहे पण गेंड्याच्या कातड़ीचे सरकार या मागणीकड़े दुर्लक्ष करत आहे असेच एक आंदोलन बीड मधून शेख वसीम शेख सलीम यांच्या वतीने सुरु आहे त्यांनी मुस्लिम आरक्षण मागणीसाठी चक्क बीड ते मुंबई मंत्रालय पायी प्रवास सुरु केले आहे याची माहिती मुस्लिम आरक्षण समितीला मिळताच समितीने औरंगाबाद येथे जाऊन त्यांचे सत्कार करुन प्रोत्साहित केले व औरंगाबाद वाळूज ते पंढरपुर गांवापर्यंत त्यांच्या सोबत पायी चालत आरक्षण समितीचा पाठिंबा जाहिर केला व वाटेमध्ये कसलीही मदत लागली तर आरक्षण समिती आपल्या सोबत आहे असे आश्वासन दिले समाजाने शेख वसीम यांना सहकार्य करावे प्रवासा त त्यांना येणाऱ्या अडचणी दूर करावे असे आवाहन मुस्लिम आरक्षण संघर्ष समितीचे बीड जिल्हाध्यक्ष व राज्य संघटक ॲड. प्रा. इलियास इनामदार यांनी केले आहे. यावेळी त्यांच्यासोबत समाजसेवक शेख पाशा भाई,अफरोज अतार ॲड. सय्यद मिन्हाजोद्दीन,शेख इस्माइल,शेख अब्बास शेख हमीद आदींनी शेख वसीम यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार करून प्रोत्साहन केले.

---

## कब्रस्तानची जमीन वाचविण्यासाठी लढाणारांना जीवे मारण्याची धमकी

### जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे कायदेशीर कारवाई करण्याची मागणी

बीड । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास का बसलात. असा दम देत तुमच्यावर खोटे गुन्हे दाखल करून जिवे मारून टाकू अशी धमकी कब्रस्तानच्या जमिनीवर अतिक्रमण केलेल्यांनी दिल्याने सामाजिक कार्यकर्ते आसीम जरगर आणि जमील कुरेशी या दोघांनी बीड जिल्हा पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनातून धमक्या देणारे अतिक्रमण धारकांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

किल्ले धारूर येथील सामाजिक कार्यकर्ते आसिम सादेक जरगर आणि जमील युसूफ कुरेशी रा. रंगार गल्ली, धारूर ता.धारुर जि.बीड. यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, धारुर येथील सर्व्हे नं. ६२२,६२३ मध्ये दिनांक २५ जुलै २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे कार्यालया समोर अकृषि परवाना बोगस असल्याच्या कारणाने आमरण उपोषण करण्यात आले होते. आंदोलनादरम्यान जिल्हाधिकाराऱ्यांनी आश्वासन दिल्यानंतर आमरण उपोषण सोडण्यात आले होते. नंतर संजीत जगन्नाथ कोमटवार व त्याचा मुलगा साई संजीत कोमटवार व त्यांच्या सोबत इतर ४ ते ५ जण आले व मला जिवे मारण्याची धमकी दिली व खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या देत आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये आमच्या विरोधात सुरेश रामचंद्र कोमटवार व त्यांचे भाऊ संजय रामचंद्र कोमटवार आणि दिलीप हरीनाथ कोमटवार व त्यांचे ३ मुले अमित दिलीप कोमटवार, अजय दिलीप कोमटवार, अक्षय दिलीप कोमटवार यांच्या विरोधात निवेदन दिले होते. धारूर येथील कब्रस्तानच्या जमिनीवर कब्जा करून बसलेले वरील सर्व व्यक्तींवर दिंद्रुड पोलीस स्टेशन येथे ३०७ व इतर गुन्हे दाखल आहेत. सदरील हे लोक हे गुंड प्रवृत्तीचे आहेत. त्यांच्या वर अनेक प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयास बोगस एन.ए. लेआऊट व ६२२ मध्ये अतिक्रमण काढण्यासाठी व निदर्शनास का आणून देत आहेस. आमच्या चुलते व भावास कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाल्यास तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी देत आहे. या लोकांपासून मला व माझ्या कुटुंबास जिवीतहानी होण्याची दाट शक्यता आहे. तरी पोलीस अधिक्षक साहेबांनी माझ्या अर्जाचा सहानभुती पुर्वक विचार करुन या धमक्या देणारे वरील सर्व अतिक्रमण धारक आरोपींवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. अशी मागणी आसीम जरगर आणि जमील कुरेशी यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

---

## सय्यद हसीब अख्तर एलएमएम मध्ये प्रथम क्रमांकाने उतिर्ण

बीड । प्रतिनिधी

शहराच्या भालदारपुरा भागातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, प्रसिद्ध स्तंभ लेखक, कवी, शायर, उर्दू साहित्याचे गाढे अभ्यासक तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील उर्दू विभागाचे स्वीकृत सदस्य सय्यद हसीन अख्तर यांचे चिरंजीव सय्यद हसीब अख्तर हे नुकत्याच जाहीर झालेल्या कायद्याच्या एलएमएम परीक्षेत एम.पी. लॉ कॉलेजातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहे.

सय्यद हसीब अख्तर यांनी इयत्ता १ली ते ७वी पर्यंतचे शिक्षण बीड शहरातील राजीव गांधी प्राथमिक उर्दू शाळेत, इयत्ता ७वी ते १०वी चे माध्यमिक शिक्षण बीड शहरातीलच अल्? हुदा उर्दू शाळेत तर इयत्ता ११वी व १२वी हे उच्च माध्यमिक शिक्षण बीड शहरातीलच मिल्लीया उच्च माध्यमिक विद्यालयातून पूर्ण केले. इथपर्यंतचे संपूर्ण शिक्षण त्यांनी विशेष गुणवत्तेने पूर्ण केल्यानंतर एलएलबी चे शिक्षण घेण्याकरिता औरंगाबाद येथील एम.पी. लॉ कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. तिथे एलएलबी केल्यानंतर लगेचच एलएमएम चे शिक्षण सुद्धा तिथेच घेतले. नुकतेच एलएमएम चा निकाल जाहीर झाला असून त्यात सय्यद हसीब अख्तर यांनी एम.पी. लॉ कॉलेजमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला. विशेष म्हणजे त्यांचे संपूर्ण शिक्षण उर्दू माध्यमातून झाले आहे. आता यापुढे त्यांचा पीएचडी करण्याचा मानस आहे. त्यांनी मिळविलेल्या या घवघवीत यशामुळे त्यांचे सर्व नातेवाईक, आप्तेष्ट आणि मित्र परिवाराकडून अभिनंदन होत असून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी हृदयी शुभेच्छा दिल्या जात आहे.

---

### जाहीर प्रगटन

**मा.श्रीमती एफ.बी. बेग २ रे सह दिवाणी न्यायाधीश व स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर २०१/२०२४**

**जलसा निरंक, विधीज्ञ : ॲड. एम.आर. उबाळे**

मागणी:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत. अर्जदार: १) जलसा भ्र. हरिश्चंद्र कोटुळे, वय ६७ वर्षे, धंदा- घरकाम, पत्ता- वरवटी पो. पालवण ता. जि. बीड, २) अनिल हरिश्चंद्र कोटुळे, वय-४७ वर्षे, धंदा- शेती. रा- वरवटी पो. पालवण ता. जि. बीड ३) शोभा भ्र. जगन्नाथ डांबे, वय- ४७ वर्षे, धंदा- घरकाम, रा- सारोळे, पुणे ता.जि. पुणे ४) सुनिता भ्र. अनिल घोडके, वय- ४० वर्षे, धंदा- घरकाम, रा- लोळदगाव ता. जि. बीड

विरुध्द निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे हरिश्चंद्र पि. केशवराव कोठुळे हे राहणार वरवटी पो. पालवण, ता.जि. बीड हे दिनांक ०९/०५/२०२३ रोजी वरवटी पो. पालवण, ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयत नामे हरिश्चंद्र पि. केशवराव कोठुळे यांची पत्नी असुन अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा आहे. अर्जदार क्र. ३ व ४ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयत नामे हरिश्चंद्र पि. केशवराव कोठुळे यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरह मयत हरिश्चंद्र पि. केशवराव कोठुळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल यांची नोंद घ्यावी. **सदर प्रकरणात पुढील तारीख ०८/०७/२०२४ आहे. आज दिनांक ३१/०१/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.**

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

स्वाक्षरित
क लिपीक

शिक्का

---

### जाहीर प्रगटन

**मा.श्री ओ.एन. मंत्री साहेब, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १५८९/२०२३**

**त्रिंबक भीमराव मेंगडे विरूध्द निरंक-ॲड. एम आर. उबाळ**

अर्जदार : १. त्रिंबक भीमराव मेंगडे रा. मेंगडेवाडी, ता.जि. बीड, २. बबन पि भीमराव मेंगडे, रा सदर, ३. वच्छलाबाई भ्र. मच्छिंद्र धुमाळ, रा पिंपळवाडी ता.जि. बीड, ४. सुशीला भ्र. बबन खिल्लारे, रा. पोखरी ता.जि.बीड, ५. रुखमिनबाई भ्र. भारत मडके, रा. लोळदगांव ता. गेवराई जि बीड. ६. कलावती भ्र. जालिंदर भिंगले रा. बेलखंडी ता. पाटोदा जि बीड.

विरुध्द निरंक

मागणी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत भिमराव पि मारोती मेंगडे यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत भिमराव पि मारोती मेंगडे, यांचा मृत्यु दिनांक ११/०१/२०१६ रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत भिमराव पि मारोती मेंगडे, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत भिमराव पि मारोती मेंगडे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी, **आज दिनांक ०९/०७/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १४/०८/२०२४ आहे.**

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

स्वाक्षरित
क लिपीक

शिक्का

---

### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती डी.के. पाटील ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ९३८/२०२४**

**मंगल भास्कर चौधरी व इतर विरुध्द निरंक ॲड. डी. एस. डोईफोडे**

अर्जदार :- १) मंगल भ्र. भास्कर चौधरी, वय ५६ वर्ष, धंदा घरकाम, रा. मांजरसुंबा, ता. जि. बीड. विरुध्द निरंक मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र (Heirshi Certificate) मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे बाळु उर्फ बालासाहेब पि. भास्कर चौधरी यांचे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ से कलम २ नुसार वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत नामे बाळु उर्फ बालासाहेब पि. भास्कर चौधरी रा. मांजरसुंबा, ता.जि. बीड यांचा मृत्यु दिनांक २५.१०.२०१६ येथे झाला, अर्जदार मयताची आई आहे. मयतास सदर अर्जदाराशिवाय इतर कुणीही वारस नाही. वरील अर्जदारास मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार व गैरअर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत बाळु उर्फ बालासाहेब पि. भास्कर चौधरी यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ०८/०७/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक ०७/०८/२०२४**

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

स्वाक्षरित
क लिपीक

शिक्का

# राष्ट्रीय वृध्दत्व व मानसिक आजार केंद्रातील कर्मचारी निवासी इमारतीसाठी २६ कोटी ६३ लक्ष निधी उपलब्ध

## आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला आले यश

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथील राष्ट्रीय वृध्दत्व व मानसिक आजार केंद्रातील वर्ग१,२,३ आणि ४ च्या कर्मचारी निवासी इमारती साठी २६ कोटी ६३ लक्ष ७१ हजार १९६ रुपयांच्या अंदाजपत्रक व आराखडयास सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने मंजुरी देण्यात आली आहे. सदरील निधी उपलब्ध व्हावा यासाठी या विभागाच्या आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी प्रयत्न केले होते.



या संदर्भात महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने २ जुलै २०२४ रोजी शासन निर्णय क्रमांक: प्रशामा-२०२४/ प्र.क्र.११८/ आरोग्य-३अ मंत्रालय काढण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक ०८.०२.२००८ अन्वये मराठवाडा विकास कालबध्द कार्यक्रम सन २००८-२००९ व २००९-२०१० अंतर्गत बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई जि.बीड येथे राज्यातील पहिले वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्राची स्थापना करण्यास मान्यता देण्यात आली होती. राष्ट्रीय वृध्दत्व व मानसिक आजार केंद्र, अबांजोगाई जि. बीड येथे वर्ग-१,२,३,व ४ अधिकारी व कर्मचारी यांची निवासस्थाने बांधण्याकरीता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अंबाजोगाई, जि. बीड यांच्याकडून प्राप्त झालेले आराखडे व अंदाजपत्रक रू. २६,६३,७१,१०६/- (अक्षरी रू. सव्वीस कोटी त्रेसष्ट लक्ष एकाहत्तर हजार एकशे सहा फक्त) इतक्या किमतीच्या अंदाजपत्रक व आराखड्यांना प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

या संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने शासन निर्णय काढण्यात आला असून या निर्णयात असे म्हटले आहे की, राष्ट्रीय वृध्दत्व व मानसिक आजार केंद्र, अबांजोगाई जि. बीड येथे वर्ग-१,२.३.व ४ अधिकारी व कर्मचारी यांची निवासस्थाने इमारत बांधकामाचे एकूण रू. २१.४२ कोटी (अक्षरी रू. २१ कोटी ४२लक्ष फक्त) इतक्या अंदाजपत्रकास अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत असल्याचे म्हटले आहे.

### आ. मुंदडा यांनी मानले आभार!



अंबाजोगाई येथील राष्ट्रीय वृध्दत्व व मानसिक आजार केंद्रात कार्यरत असलेल्या कर्मचारी निवासासाठी सदरील निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब, मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, मा. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेब, मा. आरोग्यमंत्री तानाजी सावन्त साहेब, मा. लोकनेत्या पंकजाताई मुंडे साहेब, मा. माजी खासदार प्रीतमताई मुंडे साहेब याचे आभार मानले आहेत.

### डॉ. विमल मुंदडा यांच्या कार्यकाळात इमारतीला मंजुरी

अंबाजोगाई येथील राष्ट्रीय वृध्दत्व व मानसिक आजार केंद्र हे तत्कालीन सार्वजनिक आरोग्य मंत्री कै. डॉ. सौ. विमल मुंदडा यांनी मराठवाडा विकास कालबद्ध कार्यक्रम योजनेत सन सन २००९-२०१० या कालावधीत मंजूर केले होते. बेंगलोर येथील राष्ट्रीय वृध्दत्व व मानसिक आजार केंद्राच्या धर्तीवर अंबाजोगाई सारख्या मध्यम शहरी भागात हा मोठा उपक्रम सुरु करण्याचा त्यांचा निर्णय महत्वकांक्षी ठरला होता. त्यावेळी उपलब्ध झालेल्या निधीमध्ये अत्यंत देखणी अशी या रुग्णालयाची इमारत बांधण्यात आली होती.

### आ. नमिता मुंदडा यांनी घेतला निवासी इमारतीसाठी पुढाकार

कोवीड काळात या इमारतीत सुरु करण्यात आलेल्या राष्ट्रीय वृध्दत्व व मानसिक आजार केंद्र व स्त्री रुग्णालयाचा होणारा वाढता विस्तार लक्षात घेता याठिकाणी वर्ग १, वर्ग २,वर्ग ३ आणि वर्ग ४ च्या कर्मचारी निवासी इमारती बांधकामासाठी डॉ. विमल मुंदडा यांच्या राजकीय वारस आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी पुढाकार घेतला असून राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडे सतत केलेल्या पाठपुराव्यामुळे या कृती आराखड्यास मंजुरी मिळाली आहे.

## इनरव्हील क्लबतर्फे डॉक्टर्स डे साजरा

### डॉक्टर्सच्या कर्तृत्व गौरव सोहळ्याचे आयोजन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई इनरव्हील क्लब तर्फे डॉक्टर्स डे चे औचित्य साधत अंबाजोगाईतील वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असलेल्या सामाजिक बांधिलकी जपत वैद्यकीय सेवा देत असलेल्या डॉक्टर्सचा प्रातिनिधिक स्वरूपात गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.



या गौरव सोहळ्यात इंडीयन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्य सांस्कृतीक समितीचे प्रमुख तथा सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले, स्त्री रूग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षिका डॉ.अरूणा केंद्रे, स्त्री रोग व प्रसूती विभागाचे विभागप्रमुख डॉ.गणेश तोंडगे, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ.स्नेहल पेस्टे, बधिरीकरण विभागाच्या डॉ.राजश्री धाकडे, माधवबागच्या अंबाजोगाई शाखेच्या डॉ.गौरी कुलकर्णी, दंतरोग तज्ज्ञ डॉ.अश्विनी सोनी, डॉ.अश्विनी भुसारे यांचा इनरव्हील क्लबच्या वतीने प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार करण्यात आला. यावेळी सत्काराला उत्तर देताना सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी आजचा सत्कार हा सत्कार्याचा सत्कार होत आहे. हे सत्कार सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींना सकारात्मक ऊर्जा देत असतात. प्रत्येक सत्कारागणिक ◀◀ पान ३ वर

## सिद्धेश्वर महाविद्यालयास ११ व १२ जुलै रोजी नॅक समितीची भेट





**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाचे बेंगलोर येथील नॅक पीयर टीमकडून दिनांक ११ व १२ जुलै रोजी मूल्यांकन होणार आहे.

या समितीचे अध्यक्ष म्हणून प्रोफेसर नासेर अहमद खान (कुलगुरू, अपेक्स प्रोफेशनल युनिव्हर्सिटी पासी घाट, अरुणाचल प्रदेश) तसेच समन्वयक म्हणून प्रोफेसर एस. रवी (थिरूवरूर, तमिळनाडू) व सदस्य म्हणून प्रोफेसर सुंरिदरसिंग (प्राचार्य, गुरुनानक महाविद्यालय किलिंनवली, हिमाचल प्रदेश) हे असणार आहेत.

यावेळी ते महाविद्यालयातील वेगवेगळ्या विभागांचे,मंडळांचे, व विविध समिती यांचे प्रत्यक्ष भेटी द्वारे मूल्यमापन करणार आहेत. त्याचबरोबर दुपारच्या सत्रामध्ये संस्थेच्या ◀◀ पान ३ वर

## मुसळधार पावसाचा तडाखा, कडी नदीच्या पुरात तात्पुरता पूल गेला वाहून

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील कडा शहरात मागील अनेक महिन्यांपासून बीड-नगर राष्ट्रीय महामार्गावरील साबलखेड ते आष्टी या अंतरावरील रस्त्याचे काम सुरू आहे. कडा येथे रहदारीसाठी केलेला पर्यायी पूल सोमवारी रात्री झालेल्या पावसाने वाहून गेल्याने संपर्क तुटला आहे. यामुळे वाहनधारकांनी येण्याजाण्यासाठी पर्यायी रस्त्याचा अवलंब करावा असे आवाहन तहसीलदार प्रमोद गायकवाड यांनी केले आहे.



बीड-नगर राष्ट्रीय महामार्गावरील साबलखेड ते आष्टी या रस्त्याचे काम गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू आहे. संबंधित विभागाकडून संथगतीने काम सुरू असल्याने अनेक अडचणीचा सामना प्रवाशी, वाहनधारकांना ◀◀ पान ३ वर

## शहरातील मुख्य रस्त्यांच्या दुरुस्तीकडे नगरपरिषदेचे दुर्लक्ष

### खड्ड्यात पावसाचे पाणी जमा झाल्यामुळे रस्त्यावर घाणीचे साम्राज्य

**धारूर । प्रतिनिधी**

धारूर शहरातील मुख्य बाजारपेठ असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज चौक ते काशिनाथ चौक या परिसरामध्ये शहरातील मुख्य बाजार पेठ आहे नेहमीच वरदळीचा असणारा रस्ता पूर्ण खराब झाला आहे रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहे त्यामुळे बाजारपेठेत येणाऱ्या वाहनधारकांना खड्डे चुकवत मार्ग काढावा लागतो. रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये मुरूम कचकडी टाकून काम केले जाते परत आठ दिवसांमध्ये रस्त्यावरील खड्डे उघडे पडतात त्यामुळे अपघात होऊ शकतात



पावसाळा सुरू झाल्यामुळे या खड्ड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी जमा होऊन तळ्याचे स्वरूप आले आहे. तसेच तसेच छत्रपती संभाजी महाराज चौक ते कासार तलाव या मार्गाची मोठ्या प्रमाणावर दुर्दशा झाली आहे रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे पावसामुळे या खड्ड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी जमा झाल्यामुळे रस्ता पूर्ण झाकून जात आहे पाणी साचल्यामुळे वानधारकांना व पायी चालणाऱ्या नागरिकांना पाण्यातून रस्ता शोधणे कठीण जात आहे त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे या प्रश्नाकडे नगरपरिषद प्रशासनाने लक्ष देऊन नागरिकांच्या समस्या सोडवाव्यात अशी मागणी शहरातील नागरिक करत आहेत. शहरातील या मुख्य रस्त्यांवर घाणीचे साम्राज्य

हनुमान चौक ते काशिनाथ चौक मुख्य बाजारपेठेतील रस्ता

छत्रपती संभाजी महाराज चौक ते कासार तलाव कसबा विभाग लाकडी मशीन ते मच्छी मार्केट पर्यंतचा रस्ता

हे सर्व रस्ते वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याकारणाने नगरपरिषदेने या रस्त्याची पावसाळ्यापूर्वी दुरुस्ती करणे आवश्यक होते नगर परिषदेच्या कामचुकार वृत्तीमुळे शहरातील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

## मौजे जोला येथे ऊसतोड कामगारांच्या ७३ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वितरण समारंभ संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

मौजे जोला ता केज येथील ऊसतोड कामगारांच्या मुलामुलींना मा.शेखरजी मुंदडा संस्थापक महाएनजीओ फेडरेशन आणि श्री तुळजाभवानी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था जोला पो देवगाव ता केज जि बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात शालेय साहित्य वाटप करण्यात आले.



जोला व परिसरातील ऊसतोड कामगारांच्या ७३ मुलामुलींना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हनुमाननगर ( जोला ) ता केज जि बीड येथे मंगळवार दिनांक ०९ जुलै २०२४ रोजी सकाळी ११ वाजता जोला व परिसरातील १० आणि १२ वी तील गुणवंत विद्यार्थी विद्यार्थिनींना सन्मानित करण्यात आले तसेच ऊसतोड कामगारांच्या मुलामुलींना शालेय साहित्य व दप्तर वाटप करण्यात आले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदरणीय शोभाताई लटपटे, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी केज, श्री लहुराज राऊत

तालुका संरक्षण अधिकारी महिला व बालविकास विभाग

केज .श्री जहागीरदार एस एस विस्तार अधिकारी महिला व बालविकास विभाग पंचायत समिती केज, बाजीराव ढाकणे बीड जिल्हा समन्वयक महाएनजिओ फेडरेशन महाराष्ट्र राज्य, ह प भ महादेव महाराज घोळवे पिंपळगावकर या मान्यवर मंडळींची उपस्थित होती . या कार्यक्रमाचे आयोजन नियोजन श्री तुळजाभवानी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था जोला च्या सचिव सौ आशाताई बाजीराव ढाकणे यांनी केले असून महा एनजीओ फेडरेशनने बहुमूल्य योगदान दिलेले आहे. यावेळी जयश्री मुंडे, मिराताई मुंडे मनोहर ढाकणे, फुलचंद ढाकणे, सकाळ माध्यम समूहाचे केज विधानसभा मतदारसंघाचे समन्वयक गोविंद ढाकणे,श्रीमंत ढाकणे,योगेश ढाकणे, गणेश ढाकणे, सिध्देश्वर ढाकणे, भामाबाई ढाकणे , राहीबाई ढाकणे ,नागरबाई

## अफाट गर्दीत.. उदंड उत्साहात, केजकरांनी माझे भारावून टाकणारे कौटुंबिक स्वागत केले-खा.सोनवणे

**केज । प्रतिनिधी**

वाढदिवसाचे निमित्त, लोकसभेचा विजय आणि माझ्या हृदयातल्या माणसांनी केज शहरात आयोजित नागरी सत्कार सोहळ्यात माझा अविस्मरणीय सन्मान केला. त्यापूर्वी झालेले भव्य स्वागत कधीही विसरू शकणार नाही. हा पारिवारिक सोहळा होता. माणसे मोठ्या उत्साहात आपापली कामे टाकून माझ्यासाठी, माझ्या प्रेमापोटी आली. त्यांचा सत्कार स्वीकारून आभार मानत सर्वांशी संवाद साधला.



''तुमच्यातला आपला माणूस म्हणून मी देशाच्या संसदेत पोहोचलो. विनम्रपणे तुमचा हा सत्कार स्वीकारतो. आपणा सर्वांना वंदन करतो. तुम्ही दिलेली शक्ती आता देशाच्या संसदेत गर्जत आहे. तुमचा आवाज तिथपर्यंत पोहोचवण्याचं काम तुम्हीच केलं आहे. तुमच्यासाठी जिंकलो, आता तुमच्यासाठीच लढायचं आहे. तुमच्या प्रश्नांचा, अडचणींचा एल्गार लोकसभेत करतोय. तुमचा हा आशीर्वाद मला ताकद देतोय. लोक आपल्याला निवडून देतात मग लोकांसाठी काम करायचं.

आमचे नेते आदरणीय जयंत पाटील साहेब, भगिनी आदरणीय सुप्रियाताई मला मोठा सन्मान देतात. देशाच्या आदरणीय राहुल गांधी, अखिलेश यादव साहेबांच्या बाजूला ◀◀ पान ३ वर

## मोफत उच्च शिक्षणाच्या निर्णयामुळे मुलींची आणखी प्रगती होईल-डॉ.सारिकाताई क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

'मुलगी शिकली, प्रगती झाली' हे मुलींनी सर्वच क्षेत्रात गरुडझेप घेऊन सिध्द करून दाखवले आहे. अशात आता मुलींना आणखी बळ देण्याच्या उद्देशाने महायुती सरकारने मोफत उच्च शिक्षणाचा निर्णय घेतला असून शैक्षणिक आणि परीक्षा शुल्कामध्ये १०० टक्के सवलतीचा लाभ मिळणार आहे. यामुळे मुलींची आणखी प्रगती होणार आहे. या निर्णयाचे सर्वस्तरातून स्वागत केले जात आहे. कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी महायुती सरकारचे आभार मानले आहेत.



पत्रकात पुढे म्हटले आहे की, व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग तसेच इतर मागासवर्ग प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्कात १०० टक्के प्रतिपूर्ती देण्याचा म्हणजेच शिक्षण पूर्णपणे मोफत देण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला होता.

यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून प्रसिद्ध करण्यात आला आहे. यामुळे सर्वसामान्य कुटुंबातील मुलींचं उच्चशिक्षणाचं स्वप्न पूर्ण होणार आहे. यापुढे जिजाऊ- सावित्रीच्या प्रत्येक लेकीला आकाशाला गवसणी घालण्यास महायुती सरकारचं बळ मिळणार आहे. या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, ना.अजितदादा पवार, कृषी मंत्री ना.धनंजय मुंडे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना.चंद्रकांतदादा पाटील, महिला व बालविकास मंत्री ना.आदितीताई तटकरे यांचे आभार मानले आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# शिवबंधन बांधताच ठाकरेंकडून वसंत मोरेंना मोठी जबाबदारी; मनसेलाही लगावला टोला



मुंबई : पुण्यातील माजी नगरसेवक आणि वंचित बहुजन आघाडीकडून लोकसभा लढवलेल्या वसंत मोरे यांनी काही दिवसांपूर्वी मातोश्रीवर जाऊन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंची भेट घेतली होती. या भेटीनंतर त्यांनी ९ जुलै रोजी आपण शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचं जाहीर केलं होतं. त्यानुसार, गाड्यांचा मोठा ताफा, हातात भगवे झेंडे घेत वसंत मोरे यांनी मुंबई गाठली. पुण्यातील शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत आणि मनसेतून त्यांच्यासोबत शिवसेनेता आलेल्या पदाधिकाऱ्यांसमवेत मातोश्रीवर जाऊन शिवबंधन बांधले. यावेळी, बऱ्याच दिवसांनी पाऊस आला, आणि पावसासोबत वसंतही आला, असे म्हणत शिवसेना खासदार संजय राऊत यांनी वसंत मोरेंचे स्वागत केले. तर, उद्धव ठाकरेंनीही वसंत मोरेंचे पक्षात स्वागत करताना, तुम्ही सर्वजण जुने शिवसैनिक आहात, तुमचा पक्षात प्रवेश नसून स्वगृही परतत आहात. मात्र, तुम्हाला शिवसेना सोडल्याची शिक्षा द्यायला हवी, असे म्हणत आता पुण्यात शिवसेना आणखी वाढवा, हीच जबाबदारी मी देत असल्याचे म्हटले.

मातोश्रीवर आज उद्धव ठाकरेंच्याहस्ते वसंत मोरेंसह त्यांच्या समर्थकांनी शिवबंधन बांधले. यावेळी, शिवसेना नेते संजय राऊत, आमदार सचिन अहीर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी, भाषण करताना वसंत मोरेंनी आता पुन्हा शिवसेनेत परत आलो असून हा पक्षप्रवेश नसून आपल्याच पक्षात घरवापसी करत असल्याचे म्हटले.

उद्धव ठाकरेंनीही आपल्या भाषणात बोलताना वसंत मोरेंना चिमटा काढला. शिवसेना सोडून दुसऱ्या पक्षात गेल्यानंतर काय मान-सन्मान मिळतो, कसा अपमान केला जातो, असे म्हणत मनसेकडून देण्यात आलेल्या वागणुकीवरुन अप्रत्यक्षपणे टोला लगावला. ''शिवसेना सोडल्याबद्दल शिक्षा तर मिळालयाच हवी, ती वसंत मोरेंनाही मिळायला पाहिजे. मी वसंत मोरेंसह तुम्हालाही शिक्षा देतोय. मला पूर्वीपेक्षा कित्येक पटीने जास्त पुण्यात शिवसेना वाढवून पाहिजे, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी वसंत मोरेंना पुण्यात शिवसेना वाढविण्याची जबाबदारी दिली आहे.

लोकसभा निवडणुकीतून महाराष्ट्राने देशाला दिशा दाखवली आहे. लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणाची ती लढाई होती. आता, गद्दारी, धोकेबाजी आणि महाराष्ट्राच्या अस्मितेच्या अस्तित्वाची लढाई होणार आहे. पुणे हे उद्याच्या सत्ताबदलाचं केंद्र असणार आहे, सत्ताबदलाचा जो पाया आहे, खडकवासल्यातून आणलं म्हटल्यावर खडक आहे. मी बरेच दिवसात पुण्यात आलो नाही, आता येईन तो शिवसैनिकांसाठी येईन. तेव्हा आपले सर्व शिवसैनिक आणि कार्यकर्त्यांना बोलवा, असे आवाहनही उद्धव ठाकरेंनी वसंत मोरेंना केलं. पुण्यात एकेकाळी शिवसेनेचे ५ आमदार होते, तो काळ मला पुन्हा आणायचा आहे. पुणे हे पुन्हा मला भगवंमय करायचं आहे. त्यासाठी, मी तुम्हा सर्वांना शुभेच्छा देतो, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी वसंत मोरेंसह मातोश्रीवर आलेल्या शिवसैनिकांकडे पुण्यात शिवसेना वाढविण्याची जबाबदारी दिली आहे.

पावसासोबत वसंतही फुलला...

वसंत मोरेंची सुरुवात शिवसेनेतून झाली आहे, ते शिवसैनिक आहेत. त्यामुळे, ते शिवसेनेत येतील याची मला खात्री होती. बऱ्याच दिवसांनी पाऊस आला आहे, आणि पावसासोबत वसंतही फुलला आहे, असे संजय राऊत यांनी म्हणतात उपस्थितांनी टाळ्या वाजवून दाद दिली. तर, आपल्याला एक चांगला शिवसैनिक मिळाला आहे, आपण सर्वांनी मिळून पुण्यातील शिवसेना वाढवुयात. तुम्हाला सामील करुन घेताना आम्हाला आनंद होत आहे, असे राऊत यांनी म्हटले.

## कोंढव्यातील नागरिकाची ४० लाखांची फसवणूक

पुणे । प्रतिनिधी

कोंढवा भागातील नागरिकाची गुंतवणुकीच्या आमिषाने ३९ लाख ८० हजारांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत कोंढवा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष चोरट्यांनी तक्रारदार यांना दाखविले. सायबर चोरट्यांनी त्यांना बँक खात्यात पैसे भरण्यास सांगितले. बँक खात्यात पैसे भरल्यानंतर चोरट्यांनी त्यांना परतावा मिळाल्याचे भासविले. तसा संदेश तक्रारदाराच्या मोबाईल क्रमांकावर पाठविला. तक्रारदाराने परताव्याबाबत विचारणा केली. तेव्हा चोरट्यांनी त्यांना परतावा दिला नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. पोलिस उपनिरीक्षक बालाजी डिगोळे तपास करत आहेत.

## पहिले लग्न लपवून दुसरा विवाह

### पत्नीला भूत लागल्याचे सांगून माहेरी सोडले

पुणे । प्रतिनिधी

पहिले लग्न झाल्याचे लपवत दुसरा विवाह करून विवाहितेला भूत लागल्याचे कारण सांगताना मौलानाकडे घेऊन जाऊन लाल रंगाचे औषध पिण्यास सांगितले आणि नंतर माहेरी सोडणाऱ्या सासरच्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

जाविद जमील शेख (वय ३५), जमील शेख (वय ६०), शेहनाझ जमील शेख (वय ५०), नजराना जाविद शेख (वय ३०, रा. शिवनेरीनगर, कोंढवा खुर्द) अशी गुन्हा दाखल केलेल्यांची नावे आहेत. त्यांच्यावर जादूटोणा विरोधी कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. याबाबत एका २६ वर्षीय महिलेने कोंढवा पोलिस ठाण्यात पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार हा प्रकार २०१९ ते जुलै २०२४ दरम्यान घडला. पत्नीबरोबर तलाक झाला असल्याचे तिला खोटे सांगून तिच्यासोबत लग्न केले. नंतर तिला तुझ्या घरच्यांनी लग्नात हुंडा दिला नाही म्हणून हिणवले. याच दरम्यान आरोपीची पहिली पत्नी फिर्यादीच्या सासरी पुन्हा नांदण्यास आली. त्यांच्यात एकत्र राहत असताना सतत वाद होत होते. त्यामुळे फिर्यादी आजारी पडल्याने सासरच्यांनी तिला भूत लागले आहे, असे म्हणून एका मौलानाकडे नेले. तेथे त्याने तिला लाल रंगाचे औषध पिण्यास दिले. नंतर तिला तिच्या येरवडा येथील काकांच्या घरी सोडून दिले. पुन्हा तिला नांदायला नेले नाही. त्यामुळे त्या आपल्या चुलत्यासोबत सासरी गेल्या असता त्यांना व त्यांच्या चुलत्यांना सासरच्यांनी मारहाण केली. तसेच, शिवीगाळ करून खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देऊन घरातून हाकलून दिले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## पुणे, अहमदनगरसह विविध शहरातील कॅन्टोन्मेंट बोर्डाबात मोठा निर्णय, शासनाकडून मार्गदर्शक सूचना जारी

पुणे । प्रतिनिधी

कॅन्टोन्मेंट बोर्ड नागरी क्षेत्रात विलीन होणार आहे. कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या (उरपींपाशपीं छशुी) मालमत्तेवरील मालकी हक्क, नगरपालिका, स्थानिक संस्थेकडे विनामूल्य हस्तांतरित करता येणार आहे. या,संदर्भात कॅन्टोन्मेंट बोर्डांसाठी मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आली आहे. अहमदनगर, अजमेर, औरंगाबाद, बबिना, बेळगाव, कन्नूर, देवळाली, कामठी, खडकी, मोरार, नसिराबाद, पुणे, सागर आणि सिकंदराबादसह अनेक शहरांमध्ये कॅन्टोन्मेंट बोर्डांचे नागरी क्षेत्रात विलीनीकरण करण्यासाठी सरकारने नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. संरक्षण सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीनंतर संरक्षण संपदा महासंचालनालयाने (डीजीडीई) कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतून नागरी क्षेत्र वगळण्यासाठी ही नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.



कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या मालमत्तेवरील मालकी हक्क, जे नगरपालिका सेवा आणि नागरी सुविधा पुरवण्यासाठी आहेत. त्या राज्य नगरपालिका किंवा स्थानिक संस्थेकडे विनामूल्य हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव आहे. राज्य नगरपालिकेचे प्रादेशिक कार्यक्षेत्र लष्करी स्थानक सोडून छावणीच्या संपूर्ण नागरी क्षेत्रापर्यंत विस्तारित करण्याचा प्रस्ताव आहे. जेथे जेथे भारत सरकारचे (त्रेख्व) जमिनीवर मालकीचे हक्क आहेत, ते केंद्र शासनाकडे राखले जातील. या अटींच्या अधीन राहून संपूर्ण नागरी क्षेत्र राज्य नगरपालिकेकडे सुपूर्द केले जातील व तिथे स्थानिक नगरपालिका कायदे लागू होतील. राज्य नगरपालिका त्यांच्या अधिकारक्षेत्रातील अशा क्षेत्रांवर स्थानिक कर लादण्यास सक्षम असेल.

## मतदार संघातील शेतकऱ्यांच्या खात्याचे पिक विम्याचे अर्ज आ. आशुतोष काळे भरणार

कोपरगाव । प्रतिनिधी

खरीप हंगाम २०२४ साठी पीक विमा भरण्याची सुरुवात १८ जून पासून सुरु झाली आहे. मागील वर्षी असंख्य शेतकऱ्यांनी पिक विमा भरून या योजनेत सहभाग घेतला होता. याहीवर्षी शेतकऱ्यांना पिक विमा योजनेचा लाभ मिळावा यासाठी खरीप हंगामातील सर्वच पिकांचे पिक विम्याचे अर्ज आ. आशुतोष काळे भरणार आहे.

दुष्काळ, अतिवृष्टी, आदी नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होवून शेतकरी आर्थिक अडचणीत येत असल्यामुळे शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीची भरपाई मिळावी यासाठी शासनाच्या वतीने पिक विमा योजना राबविली जात आहे. पिक पेरणीपासून काढणी पर्यंतच्या कालावधीत पिकांच्या उत्पादनात येणारी घट, पिक पेरणीपूर्व किंवा लावणीपूर्व नुकसान, हंगामातील प्रतिकूल परिस्थितीमुळे नुकसान, काढणी पश्चात पिकाचे नुकसान, स्थानिक नैसर्गिक आपत्ती मुळे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांनी घेतलेल्या पिक विमा योजनेच्या माध्यमातून विमा कंपनी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देते. मागील वर्षी शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचा मोबदला मिळावा यासाठी आ.आशुतोष काळे यांनी केलेल्या पाठपुराव्यातून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना २५ टक्के रक्कम मिळाली असून उर्वरित नुकसान भरपाईची रक्कम मिळावी यासाठी पाठपुरावा सुरु असून हि रक्कम देखील लवकरच मिळणार आहे.

यावर्षी देखील कोपरगाव मतदार संघात पावसाचे प्रमाण समाधानकारक नसले तरी येत्या काळात पावसाची सरासरी भरून निघणार असली तरी कमी पर्जन्यमान किंवा अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ शकते. हे नुकसान टाळण्यासाठी पिक विमा योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे नुकसान भरून येण्यास काही प्रमाणात मदत होणार आहे. या दृष्टीकोनातून आ.आशुतोष काळे यांनी कोपरगाव मतदार संघातील जवळपास ७१ हजार शेतकऱ्यांच्या खात्याचे सोयाबीन, कापूस, तूर, मका, बाजरी, भुईमूग,खरीप कांदा आदी खरीप पिकांच्या विम्याचे अर्ज भरून पिक विमा रक्कम देखील आपल्या पगारातून विमा कंपनीला अदा करणार आहे. त्यामुळे यदाकदाचित दुर्दैवाने शेतकऱ्यांच्या खरीप पिकांचे नुकसान झाल्यास त्यांना विमा कंपनीकडून नुकसान झालेल्या सर्वच खरीप पिकांची नुकसान भरपाई मिळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पिक विमा अर्ज भरणेसाठी बुधवार (दि.१०) पासून जनसंपर्क कार्यालयाशी संपर्क करावा असे आवाहन आ. आशुतोष काळे यांनी केले असून शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण पसरले आहे.

### आ. आशुतोष काळेंच्या कृतीतून काळे परिवाराची सामाजिक बांधिलकी



दोन वर्षापूर्वी संपूर्ण जगावर आलेल्या कोविड महामारीत कोपरगाव मतदार संघातील अनेक माता भगिनींना आपले कुंकू गमविले होते. त्यामुळे या माता भगिनींसाठी मोठा धक्का तर होताच मात्र त्यांच्यापुढे आर्थिक अडचणींचा देखील मोठा डोंगर उभा होता. त्यावेळी आ. आशुतोष काळे यांनी अशा माता भगिनींसाठी आपला तीन महिन्याचा पगार भाऊबीजेची ओवाळणी म्हणून दिला होता. व आता पुन्हा एकदा बळीराजाचे नुकसान झाल्यास त्या नुकसानीपासून आर्थिक दिलासा मिळावा यासाठी पुन्हा आपल्या पगारातून पिक शेतकऱ्यांच्या ७१ हजार खात्याच्या पिक विम्याची रक्कम आपल्या पगारातून भागवणार आहे. आ. आशुतोष काळे यांच्या या कृतीतून काळे परिवाराची सामाजिक बांधिलकी अधोरेखित होत आहे.

## मद्यधुंद अवस्थेत बेदरकारपणे वाहन चालवणं भोवलं

### तळेगावचे सीईओ पाटील निलंबित

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी

तळेगाव दाभाडे : मावळ तालुक्यातील तळेगाव दाभाडे नगर परिषदेचे मुख्याधिकारी निगण्णा कल्लण्णा पाटील (एन. के. पाटील) यांना मद्यधुंद अवस्थेत बेदरकारपणे वाहन चालवणं भोवलं आहे. एन. के पाटील यांचे निलंबन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्याचे उप सचिव अनिरुध्द जेवळीकर यांनी हे आदेश काढले आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, दि. १ जून रोजी एन. के. पाटील यांनी धोकादायक पद्धतीने चारचाकी वाहन चालवत तळेगाव येथे दोन वाहनांना धडक दिली होती. तपासात त्यांनी मद्याचे सेवन केले असल्याचे आढळून आले होते. तसे रिपोर्ट न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळेतून प्राप्त झाले होते. एन. के. पाटील यांचे महिला अधिकारी व कर्मचारी यांच्यासोबत असलेले वागणे हे अशोभनीय व असभ्य पणाचे असल्याबाबत जिल्हाधिकारी पुणे यांनी नगर परिषद प्रशासन विभागाला कळविले होते. त्यांच्यावर दाखल झालेला गुन्हा व महिला कर्मचारी यांच्यासोबत असलेल्या अशोभनीय वर्तणुकीचा अहवाल शासनाकडे प्राप्त झाला होता. त्यांच्या या वर्तणुकीमुळे शासनाची प्रतिमा मलिन होत असल्याने त्यांचे निलंबन करण्यात आल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## पोलिस हवालदाराच्या मृत्यू प्रकरणी आरोपीसह कारमधील तिघांना घेतलं ताब्यात; दारु पिवून 'ओव्हरटेक'च्या नादात कार पळवली

पुणे । प्रतिनिधी

बेदरकारपणे मोटार चालवत पोलिस हवालदाराच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी पोलिसांनी आरोपीसोबत कारमध्ये असलेल्या तिघांना ताब्यात घेतले आहे. त्यांच्या चौकशीत त्यांनी एका वाढदिवसाच्या पार्टीत मद्यपान केल्याचे पुढे आले आहे.

मद्यपान करून घरी येत असताना सिध्दार्थ केंगार हा गाडी चालवत होता. त्याला एका कारने ओव्हरटेक केल्याने त्याला राग आला. यामुळे पुढे गेलेल्या कारला ओव्हरटेक करण्याच्या नादात त्याने स्वत:ची कार दामटण्याचा प्रयत्न केला आणि अपघात झाल्याचे त्यांनी पोलिसांनी सांगितले. अपघातात पोलिस हवालदार समाधान कोळी यांचा जागीच मृत्यू झाला असून, पोलिस शिपाई संजोग शिंदे हे जखमी झाले आहेत.

रविवारी मध्यरात्री पावणे दोन वाजताच्या सुमारास बोपोडीतील आंबेडकर चौकाकडे जाणाऱ्या अंडरपासजवळ हा अपघात झाला होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी केंगार याच्या एका मित्राचा वाढदिवस होता. त्याची पार्टी करण्यासाठी सिद्धार्थ केंगार इतर तीन मित्रांसोबत स्विफ्ट कारमधून विश्रांतवाडी धानोरी येथील एका हॉटेलमध्ये गेला होता. तेथे चौघांनी मद्यप्राशन केले. त्यानंतर कारमधून ते निघाले होते. सिद्धार्थ केंगार हा कार चालवत होता. खडकी परिसरात त्याच्या कारला एका कारने



ओव्हरटेक केले. त्यामुळे त्याने लगेच रागाच्या भरात त्या कारला ओव्हरटेक करण्यासाठी पाठलाग सुरू केला. दारूच्या नशेत केंगारने जोरात कार पळवली. मात्र, त्यानंतरही त्याला काही केल्याने त्या कारला ओव्हरटेक होत नव्हती. त्यामुळे त्याने अत्यंत बेदरकारपणे कार चालवली व त्यातूनच त्याने बोपोडीत त्या कारला ओव्हरटेक करताना गस्तीवरील हवालदार कोळी आणि पोलिस शिपाई शिंदे यांच्या दुचाकीला पाठीमागून धडक दिली. त्यावेळी कारचा वेग एवढा होता की, पाठीमागे दुचाकीवर बसलेले कोळी उडून कारच्या काचेवर आदळून बोनेवटवरून खाली पडले. त्यामध्ये कोळी यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. हा प्रकार घडल्यानंतर केंगार आणि गाडीतील त्याच्या तिघा साथीदारांनी तेथून वेगात पळ काढला. पोलिसांना घटनेचा सुगावा लागू नये म्हणून त्यांनी कार लपवून ठेवली होती. त्यानंतर चौघे आप-आपल्या घरी निघून गेले होते. केंगार याला मंगळवारी (ता.९) खडकी येथील प्रथमवर्ग न्यायालयात हजर करण्यात आले होते. या गुन्ह्यात आणखी कोणाचा सहभाग आहे का? यासह गुन्ह्याच्या सखोल तपासासाठी त्याला सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात यावी, असा युक्तिवाद सरकारी वकिलांनी केला. वैद्यकीय तपासणीसाठी केंगार यांच्या रक्ताचे नमुने घेण्यात आले असल्याचे तपास अधिकारी पोलिस निरीक्षक (गुन्हे) गजानन चोरमले यांनी न्यायालयास सांगितले. आरोपीच्या वतीने ॲड. डेसमंड फ्रान्सिस यांनी बाजू मांडली.

## पुणे विमानतळाचे नवीन टर्मिनल १४ जुलैपासून होणार खुले

पुणे । प्रतिनिधी

विमानतळाचे नवीन टर्मिनल येत्या रविवार पासून (१४ जुलै) प्रवाशांसाठी खुले होणार आहे. नवे टर्मिनल कार्यान्वित करताना नव्या टर्मिनलच्या पहिल्या प्रवाशाला दुपारी १ वाजता बोर्डिंग पास देण्यात येणार आहे अशी माहिती नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली.

पुणे विमानतळाच्या नवीन टर्मिनलचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ८ मार्चला झाले होते. परंतु सीआयएसएफच्या जवानांच्या पूर्ततेच्या अभावी नवीन टर्मिनल सुरू होण्यास विलंब होत होता. मात्र मुरलीधर मोहोळ यांनी हवाई मंत्रालयाचा पदभार स्वीकारल्यानंतर कामाला गती आली.

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरील नवीन टर्मिनलसाठी 'सीआयएसएफ'ची नियुक्ती झाली. तसेच इतर तांत्रिक प्रक्रियाही पूर्णत्वास जात आहे. येत्या रविवारी म्हणजेच १४ जुलै रोजी हे नवे टर्मिनल सुरु होईल. नवे टर्मिनल कार्यान्वित करताना नव्या टर्मिनलच्या पहिल्या प्रवाशाला दुपारी १ वाजता बोर्डिंग पास देण्यात येणार आहे, असे मोहोळ यांनी आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवर सांगितले आहे.

## पत्नीचा खून करणाऱ्या उच्चशिक्षित पतीला अटक

पुणे । प्रतिनिधी

चारित्र्याच्या संशयावरून पत्नीचा विजेच्या वायरने शॉक देऊन गळा आवळून खून करणार्या आरोपी पतीला ग्रामीण पोलिसांनी अटक केली आहे.

शीतल स्वप्निल रणपिसे (वय २३, रा. रांजणगाव सांडस, ता. शिरूर, जि. पुणे) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी तिचा पती स्वप्निल श्यामराव रणपिसे (वय-२६) असे आरोपीचे नाव असल्याची माहिती पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांनी दिली.

नेमके काय झाले?

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शीतल ३ जुलै रोजी घरात एकटी होती. त्या वेळी सासरे श्यामराव, स्वप्निल, सासू शारदा कामानिमित्त बाहेर गेले होते. स्वप्निलच्या आईचे रांजणगाव सांडस परिसरात साडी विक्रीचे दालन आहे. दुपारी दोनच्या सुमारास स्वप्निल घरी आला. तेव्हा दरवाजा बंद होता. त्याने शीतलच्या मोबाईलवर संपर्क साधला, तेव्हा तिने प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे त्याने चुलतभाऊ रणजितला बोलावून घेतले. घराच्या पाठीमागील दरवाजाने दोघे जण आत गेले. तेव्हा शीतल घरात बेशुद्धावस्थेत पडली होती. तिच्या गळ्याजवळ दोरी गुंडाळली होती. तिच्या अंगठ्याला वायरने विजेचा शॉक दिल्याचे उघडकीस आले. शीतलला तातडीने केडगाव येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारांपूर्वीच तिचा मृत्यू झाला होता. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली. घरातील सामान अस्ताव्यस्त पडले होते. शीतलचा खून चोरीच्या उद्देशातून झाल्याची प्राथमिक माहिती तपासात उघडकीस आली होती. नवविवाहित तरुणीचा खून झाल्याने पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांनी तपासाबाबत सूचना दिल्या होत्या.

पोलिसांनी घराच्या परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण ताब्यात घेतले होते. सर्व शक्यता गृहीत धरून पोलिसांनी तपास सुरू केला. स्वप्निलने पोलिसांकडे फिर्याद दिली होती. पोलिसांनी त्याची चौकशी सुरू केली. उच्चशिक्षित असलेला स्वप्निल पोलिसांना दरवेळी वेगवेगळी उत्तरे देत होता. स्वप्निलची विवाहाबाबत बोलणी सुरू असताना तो विवाहेच्छू तरुणींकडे चौकशी करायचा. त्याच्या संशयी स्वभावामुळे तरुणींनी त्याला नकार दिला होता. सात महिन्यांपूर्वी स्वप्निलचे शीतलशी लग्न झाले होते. आरोपी स्वप्निल पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत होता. तिच्या गत आयुष्याबाबत तिला वारंवार विचारणा करत होता. त्यामुळे त्यांच्यात नेहमी वादविवाद होत असत. याची माहिती घेतली असता पोलिसांचा स्वप्निलवर संशय बळावला. पोलिसांनी त्याला चौकशीसाठी ताब्यात घेतले, तेव्हा चारित्र्याच्या संशयातून त्याने पत्नीचा खून केल्याची कबुली दिली. ही कारवाई पोलिस अधीक्षक पंकज देशमुख, अतिरिक्त अधीक्षक रमेश चोपडे, शिरूरचे उपविभागीय अधिकारी प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अविनाश शिळीमकर, शिरूरचे पोलिस निरीक्षक ज्योतीराम गुंजवटे, सहायक निरीक्षक राहुल गावडे, अमोल पन्हाळकर, उपनिरीक्षक एकनाथ पाटील, हवालदार सचिन घाडगे, अजित भुजबळ, अतुल डेरे, राजू मोमिन, तुषार पंदारे यांनी केली.

## पत्नीला पळवून नेलेल्याच्या अल्पवयीन भावाचे अपहरण

बारामती । प्रतिनिधी

पत्नीला पळवून नेल्याचा राग मनात धरून ज्या युवकाने पत्नीला पळवून नेले आहे त्याच्या अल्पवयीन भावाचे अपहरण केल्याप्रकरणी बारामती शहर पोलिसांनी एकास अटक केली.

जोपर्यंत माझ्या पत्नीला आणून सोडत नाही, तोपर्यंत तुझ्या भावाला सोडणार नाही, अशी धमकी संबंधित युवकाने दिली होती. या प्रकरणी आठ जुलै रोजी बारामती शहर पोलिसात अपहणाची फिर्याद दाखल केली होती. त्यानंतर शहर पोलिसांनी तातडीने दोन पथके तयार करून तपास सुरु केला होता. वारंवार लोकेशन बदलून आरोपी हुलकावणी देण्याचा प्रयत्न करत होता. तांत्रिक विश्लेषणाद्वारे माग काढून सांगली जिल्ह्यातील खानापूर येथून आरोपीस ताब्यात घेऊन संबंधित अल्पवयीन मुलाची शिताफीने सुटका केली.

जिल्हा पोलिस अधीक्षक पंकज देशमुख, अतिरिक्त पोलिस अधीक्षक संजय जाधव, उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन राठोड, स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलिस निरिक्षक अविनाश शिळीमकर, शहरचे पोलिस निरिक्षक संतोष घोळवे, सहाय्यक पोलिस निरीक्षक गजानन चेके व कुलदीप संकपाळ, फौजदार युवराज घोडके, पोलिस हवालदार यशवंत पवार, मोहंमद अंजर मोमीन, अंकुश दळवी यांनी ही कामगिरी पार पाडली.

## निघोजेच्या उपसरपंचपदी छाया येळवंडे बिनविरोध

कुरुळी । प्रतिनिधी

निघोजे (ता. खेड) येथील ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी छाया बाबासाहेब येळवंडे यांची बिनविरोध निवड झाल्याचे ग्रामविकास अधिकारी विष्णू गडीलकर यांनी दिली.

इंदिरा फडके यांनी उपसरपंचपदाचा राजीनामा दिला. यामुळे रिक्त जागेसाठी सरपंच सुनीता येळवंडे यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक घेण्यात आली. निवडणुकीसाठी येळंवडे यांचा एकमेव अर्ज दाखल आला. यामुळे सरपंच येळवंडे यांनी छाया येळवंडे यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याची घोषणा केली.

निवडणूक प्रक्रियाप्रसंगी सरपंच सुनीता येळवंडे, माजी उपसरपंच इंदिरा फडके, प्रियांका आल्हाट, अजित येळवंडे, दत्ता आंद्रे, दीपक कांबळे, सागर येळवंडे, समाधान येळवंडे, मनीषा बेंडाले, रूपाली येळवंडे, स्नेहा फडके, ग्रामपंचायतीचे आजी-माजी पदाधिकारी, ग्रामस्थ, महिला उपस्थित होत्या. येळवंडे यांची बिनविरोध निवड झाल्याने ग्रामस्थांनी फटाक्याची आतषबाजी करत जल्लोष साजरा केला.